cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३६ | बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भाजपला निर्भेळ यश नाहीच; हा तर उपऱ्यांचा विजय

राज्यातील नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले, सगळी स्थिती स्पष्ट झाल्यानंतर निकालात भाजपचे वर्चस्व असल्याचे दिसले. त्याचबरोबर राज्यातील सत्तेत असलेल्या महायुतीचे घटक पक्ष म्हणून शिंदे सेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस हे जे दोन पक्ष आहेत त्यांनाही चांगले यश मिळालेले दिसले.

# नोंद न झालेल्या पिकांची ऑफलाइन पाहणी सुरू !

## स्थानिक अधिकाऱ्यांची समिती नियुक्त२४ डिसेंबर पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये विहित मुदतीत ई–पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाइन पाहणी करणेबाबत राज्याच्या महसूल व वन विभागाने १४ डिसेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. यासाठी मंडळ अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली ग्राममहसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांची ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.**



खरीप हंगाम २०२५ मध्ये ज्या शेतकऱ्यांना काही कारणास्तव पिकांची नोंद करता आली नाही, अशा शेतकऱ्यांनी ग्राममहसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे २४ डिसेंबर २०२५ पर्यंत पिकांची नोंद करणेकरिता अर्ज सादर करावेत. तसेच संबंधित शेतकरी यांनी ग्राममहसूल अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाची पोहोच घ्यावी, असे आवाहन महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने ग्रामस्तरीय समिती संयुक्तपणे संबंधित शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी ही २५ डिसेंबर ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये करतील. सदर स्थळपाहणी करण्यापूर्वी समिती मार्फत स्थळपाहणीची दिनांक व वेळ निश्चित करून त्यांची पूर्व कल्पना संबंधित शेतकऱ्यास व शेताच्या बांधाला लागून असलेल्या किमान ४–५ शेतकऱ्यांना लेखी स्वरुपात देण्यात येणार आहे. प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या दिवशी खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी कोणत्या पिकाची लागवड केली होती त्यांची स्थानिक ▶▶ पान २ वर

# वाल्मिक कराडसह त्याच्या गँगवर आरोप निश्चित

## पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड याच्यासह इतर आरोपींविरुद्ध न्यायालयाने मंगळवारी (दि.२३ डिसेंबर) आरोप निश्चित केले. या प्रकरणी बीडमधील विशेष मकोका न्यायालयात सुनावणी झाली. यावर आता पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी होणार आहे.**



अखेर न्यायालयाने वाल्मिक कराड आणि त्यांच्या गँगविरोधात आरोप निश्चित केले. ९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष देशमुख यांचा खून कट करुन संगनमताने आरोपींनी केला आणि त्याचप्रमाणे यातील काही पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याला कारण म्हणजे वाल्मिक कराड जो खंडणी मागत होता; ती खंडणी अवादा कंपनीकडून मिळण्यास संतोष देशमुख यांनी अडथळा केला. याकरिता त्यांचा खून करण्यात आला. अशारितीचा सरकारतर्फे आरोप प्रस्तावित केला. त्यानुसार न्यायालयाने सर्व आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले, अशी माहिती विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सुनावणीनंतर दिली. या प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख ८ जानेवारी ठेवली आहे. आजही आरोपींकडून आरोप निश्चितीची सुनावणी लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न झाला. या खटल्यामध्ये आरोपींनी आतापर्यंत वेळोवेळी हातखंडे वापरून उशीर करणे आणि खटला उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला. पण आता आरोप निश्चित झाल्याने या प्रयत्नांना चाप बसला. सरकारतर्फे कागदपत्रे, ज्यांच्यावरती सरकारी वकील भिस्त ठेवत आहे; अशी कागदपत्रे आरोपींना मान्य आहेत की अमान्य आहेत यासाठी विचारले जाईल. त्यानंतर साक्षीदारांची यादी दिली जाईल. प्रत्यक्षात पुराव्याचे काम लवकरच सुरु होईल, असे ॲड. निकम यांनी सांगितले. आरोप निश्चित करण्यासाठी वेळ लागला. पण न्यायालयाला वेळ द्यावा लागतो. फास्ट ट्रॅक कोर्ट असो स्लो ट्रॅक कोर्ट असो, खटला लवकरात लवकर चालण्याचा प्रयत्न सरकारकडून होईल. ▶▶ पान २ वर

# ठाकरे बंधूंच्या युतीची आज अधिकृत घोषणा



**मुंबई । प्रतिनिधी**

ठाकरे बंधूंच्या युतीची बुधवारी दुपारी १२ वाजता अधिकृत घोषणा होणार असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे मुंबई महानगरपालिका निवडणूक एकत्रितपणे लढणार आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे अनेक वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर येऊन युतीची घोषणा करणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी मंगळवारी (दि. २३) याबाबत माहिती दिली. ▶▶ पान २ वर

# मुंबई काबीज करण्यासाठी भाजपचा मास्टरप्लॅन

## मोदी–शहा यांच्यासह सरसंघचालक भागवतही करणार प्रचार

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापू लागले आहे. राज्याची सत्ता मिळवल्यानंतर आता मुंबई महापालिका काबीज करण्यासाठी भाजपने कंबर कसली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भव्य प्रचार सभांचे आयोजन करण्यात आले आहे.**



माहितीनुसार, १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानापूर्वी भाजपचे हे दोन्ही सर्वोच्च नेते मुंबईत प्रचाराचा धडाका लावणार आहेत: ७ जानेवारी रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईत येणार असून, मुलुंडसह दोन महत्त्वाच्या ठिकाणी त्यांच्या जाहीर सभा पार पडतील. तर ११ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुंबईत भव्य जाहीर सभा होणार आहे. मोदींच्या सभेमुळे मुंबईतील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १२ जानेवारी सरसंघचालक मोहन भागवत हेदेखील मुंबईत असणार असून, ते पदयात्रा किंवा जुन्या कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेण्याची शक्यता आहे. मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे – मनसे विरूद्ध भाजप – शिवसेना शिंदे गट यांच्यात प्रमुख लढत असेल. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोन्ही गट आणि कॉंग्रेस हे वेगवेगळे लढण्याची शक्यता आहे. शिवसेना उबाठा गटासाठी तसेच मनसेसाठी ही अस्तित्वाची लढाई असणार आहे. जर मुंबई महापालिका ठाकरेंच्या हातून निसटली तर तिथून त्यांना ▶▶ पान २ वर

# जालन्याचा तोतया आएएस अधिकारी तुळजापुरात पकडला

## व्हीआयपी दर्शनासाठी घुसखोरीचा प्रयत्न

**तुळजापूर । प्रतिनिधी**

**कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी व्हीआयपी सुविधेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत असताना एका तोतया आयएएस अधिकाऱ्याचा बनावट बुरखा मंदिर कर्मचाऱ्यांनी फाडला आहे. या घटनेमुळे तीर्थक्षेत्र तुळजापूरात एकच खळबळ उडाली आहे. सदरील तोतया आएएस अधिकारी हा जालन्याचा असल्याचे समोर आले आहे.**



जालना जिल्ह्यातील एक कुटुंब मंदिर कार्यालयात आले असता, त्यातील एका व्यक्तीने आपण आयएएस अधिकारी असल्याचे सांगत व्हीआयपी दर्शनाची मागणी केली. संशय आल्याने मंदिर कर्मचाऱ्यांनी ओळखपत्राची मागणी केली. त्याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नावाचे बनावट ओळखपत्र दाखवले. कर्मचाऱ्यांनी तत्काळ सखोल चौकशी करताच हे ओळखपत्र बनावट असल्याचे स्पष्ट झाले. उलटतपासणीदरम्यान संबंधित व्यक्ती भांबावून गेला आणि पितळ उघडे पडले. त्यानंतर त्याने व कुटुंबीयांनी माफी मागण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिर प्रशासनाने तुळजापूर पोलिसांना पाचारण करून तोतया आयएएस अधिकारी व त्याच्या कुटुंबीयांना पोलिसांच्या ताब्यात दिले. या तोतयाने निखिल परमेश्वरी नावाचा आयएएस ▶▶ पान २ वर

# पंतप्रधान यांच्या पत्नी जशोदाबेन यांनी घेतले प्रभु वैद्यनाथाचे दर्शन

**परळी । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन नरेंद्र मोदी यांनी पाचवे ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर येथे दर्शन घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी या मंगळवारी (२३ डिसेंबर) परळी वैजनाथ येथे आल्या होत्या. यावेळी त्यांनी बारा ज्योतिर्लिंगापैकी असलेल्या प्रभू ▶▶ पान २ वर



# मृत्यूपत्राच्या आधारे जमिनीची वारस नोंद करणे वैध–सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

मृत्युपत्राच्या आधारे जमिनीच्या महसूल नोंदींमध्ये (सात–बारा आणि मालमत्ता नोंदणी) फेरफार करण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नाही. केवळ दावा मृत्युपत्रावर आधारित आहे म्हणून असा फेरफार नाकारला जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. केवळ मृत्युपत्राच्या ▶▶ पान २ वर



# शिक्षक भरती घोटाळ्यात आणखी एका शिक्षणाधिकाऱ्याला अटक

**नागपूर । प्रतिनिधी**

**शिक्षक भरती घोटाळ्यात एक मोठी कारवाई करण्यात आली असून आणखी एका शिक्षणाधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. नागपूर जिल्हा परिषदचे माजी शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर यांना एसआयटीने अटक केली आहे. शालार्थ ऑनलाइन वेतन प्रणालीच्या गैरवापराच्या संदर्भात एसआयटीच्या सायबर सेलने ही कारवाई केली आहे. त्यांच्यावर तब्बल १२ कोटींहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.**



नागपूर विभागाच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून आलेल्या तक्रारीनंतर ही बाब उघडकीस आली. तक्रारीच्या आधारे, सायबर पोलिस ठाण्यात फसवणुकीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. त्याची चौकशी विशेष तपास पथक करत आहे.तपासात असे दिसून आले की शालार्थ ऑनलाइन प्रणालीचा बेकायदेशीरपणे वापर करून बनावट शालार्थ आयडी आणि ड्राफ्ट तयार करण्यात आले होते. बनावट शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावाने या बनावट आयडीद्वारे वेतन आणि देणी काढण्यात आली, ज्यामुळे सरकारचे मोठे आर्थिक नुकसान झाले.या घोटाळ्यात आतापर्यंत एकूण २६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षण ▶▶ पान २ वर

# पार्थ पवार दोषीच आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करा - अंजली दमानिया

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंढवा जमीन प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची ठाम मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. या सगळ्या प्रकरणात पार्थ पवार यांना वाचवले जात आहे, आम्ही सगळे पुरावे दिले आहेत, असा दावाही दमानिया यांनी केला आहे. अंजली दमानिया आणि विजय कुंभार यांनी या प्रकरणातील काही कागदपत्रे समोर आणली आहेत. यामध्ये पार्थ पवार व शीतल तेजवानी यांच्यामध्ये झालेल्या पॉवर ऑफ ॲटर्नीशी संबधित दस्ताऐवज समोर आणले आहेत. पत्रकार परिषद घेऊन अंजली दमानिया व वियज कुंभार यांनी ही माहिती दिली.



या प्रकरणात दिग्वीजय पाटील व शीतल तेजवाणी यांचीच चौकशी होत आहे तर पार्थ पवार यांची मात्र चौकशी होत नाही. जी कागदपत्रे आम्ही सादर ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### राहुल गांधींचा जर्मनीतून भाजपवर निशाणा

बर्लिनः लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जर्मनी दौऱ्यात भाजप आणि आरएसएसवर जोरदार हल्लाबोल केला. भाजप देशातील संविधानाची मूळ भावना संपवण्याचा प्रयत्न करत असून, ईडी आणि सीबीआयसारख्या संस्थांचा वापर केवळ विरोधी नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी केला जात आहे, असा आरोप त्यांनी बर्लिनमधील हर्टी स्कूलमध्ये केला. राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोग आणि इतर स्वायत्त संस्थांवर भाजपने ताबा मिळवला असून हरियाणा व महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निष्पक्षतेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भारतात केवळ मूठभर उद्योगपतींना झुकते माप दिले जात असल्याने बेरोजगारी वाढली आहे, असेही ते म्हणाले. आरएसएससाठी सत्यापेक्षा सत्ता महत्त्वाची असल्याचा टोला त्यांनी लगावला. या दौऱ्यात त्यांनी बीएमडब्ल्यू मुख्यालयाला भेट देऊन भारतीय अभियांत्रिकीचे कौतुकही केले.

### राज्यात थंडी ओसरली; कमाल तापमानात वाढ

मुंबई : राज्यात थंडीची लाट ओसरली आहे. पुढील काही दिवस राज्याच्या किमान तापमानातील घट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात कमाल तापमानातील चढ–उतार सुरूच राहणार असून निफाड आणि धुळ्यात तापमानाचा पारा ६ अंश सेल्सियसच्या खाली गेला आहे. वातावरणात होणाऱ्या सततच्या बदलांमुळे नागरिक देखील हैराण झाले आहेत. सोमवारी निफाड येथे ५.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. धुळ्यात ५.८ अंश सेल्सिअस, परभणीत ६.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर अहिल्यानगर आणि गोंदिया येथे पारा ८ अंशाच्या खाली आहे. पुणे, मालेगाव, गोंदिया येथे ९ अंशांपेक्षा कमी, जळगाव नाशिक, नागपूर, यवतमाळ येथे १० अंशापेक्षा कमी तापमानाची नोंद झाली.

### मध्य प्रदेशात ४२ लाख मतदारांची नावे वगळली

भोपाळः मध्य प्रदेशात 'एसआयआर' अंतर्गत मतदार यादीचा नवीन प्रारूप मसुदा प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रक्रियेनंतर राज्यातील ४२ लाखांहून अधिक मतदारांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी संजीव कुमार झा यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली असून, एकट्या राजधानी भोपाळमध्येच ४ लाख ३८ हजारांहून अधिक मतदारांची नावे कापली गेल्याने मोठी खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील एकूण ५ कोटी ७४ लाख मतदारांपैकी ५ कोटी ३१ लाख मतदारांनी आपली गणना पत्रके सादर केली होती. पडताळणीअंती एकूण ४२ लाख ७४ हजार १६० मतदारांची नावे यादीतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये सर्वाधिक संख्या ही स्थलांतरित किंवा अनुपस्थित असलेल्या मतदारांची आहे.

### महापालिका निवडणुकांसाठी कॉंग्रेस सज्ज; ४० स्टार प्रचारक

मुंबईः राज्यातील नगरपालिका निवडणुकांचा धुरळा शांत होताच आता २९ महापालिकांच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. या निवडणुकांसाठी कॉंग्रेसने ४० स्टार प्रचारकांची तगडी यादी जाहीर केली असून, यात भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि तेलंगणाचे मंत्री मोहम्मद अझरुद्दीन यांच्या नावाचा प्रामुख्याने समावेश आहे. पक्षाने जाहीर केलेल्या यादीत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि विजय वडेट्टीवार यांसारख्या दिग्गजांसह कन्हैया कुमार व जिग्नेश मेवाणी या युवा नेत्यांचाही समावेश आहे. तसेच रेवंत रेड्डी, सचिन पायलट आणि राज बब्बर या राष्ट्रीय चेहऱ्यांमुळे प्रचाराला अधिक धार मिळणार आहे. स्थानिक प्रश्न आणि महागाईच्या मुद्द्यांवर कॉंग्रेस आक्रमक प्रचार करून महापालिका काबीज करण्याच्या तयारीत आहे.

### बांगलादेश दूतावासाबाहेर 'विहिंप'चे आंदोलन

दिल्लीः बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यात दीपू चंद्र या हिंदू तरुणाच्या जमावाकडून झालेल्या हत्येच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषदेने दिल्लीतील बांगलादेश उच्चायुक्तालयाबाहेर तीव्र निदर्शने केली. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याची मागणी कार्यकर्त्यांनी केली. या तणावाच्या पार्श्वभूमीवर, बांगलादेश सरकारने भारतीय उच्चायुक्त प्रणय वर्मा यांना पाचारण करून दिल्ली आणि सिलीगुडी येथील त्यांच्या दूतावासांवरील निदर्शनांबाबत चिंता व्यक्त केली. सुरक्षेच्या कारणास्तव बांगलादेशने दिल्ली आणि सिलीगुडी येथील आपली व्हिसा सेवा तात्पुरती निलंबित केली आहे. भारताने राजनैतिक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी युनूस सरकारने केली आहे. यामुळे दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध अधिक ताणले गेले आहेत.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४२.०० क्विंटल | २,२५१ | २,९४१ | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड : ४८.०० क्विंटल | २,६९० | ४,३०० | ३,२५३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ५,८५० | ५,८५० | ५,८५० |
| उडीद : १९.०० क्विंटल | ३,७०१ | ६,००० | ५,२२६ |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,४०० | ३,३०२ | २,७७३ |
| मुग: ५.०० क्विंटल | ६,४०१ | ७,१०० | ६,६७५ |
| सोयाबीन: २९२.०० क्विंटल | ४,००० | ४,६२५ | ४,५३८ |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ५,०५० | ६,४०० | ५,४१२ |

cmyk

## अग्रलेख

# भाजपला निर्भेळ यश नाहीच ; हा तर उपऱ्यांचा विजय

राज्यातील नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले, सगळी स्थिती स्पष्ट झाल्यानंतर निकालात भाजपचे वर्चस्व असल्याचे दिसले. त्याचबरोबर राज्यातील सत्तेत असलेल्या महायुतीचे घटक पक्ष म्हणून शिंदे सेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे जे दोन पक्ष आहेत त्यांनाही चांगले यश मिळालेले दिसले. या तीनही पक्षांच्या विजयाचे गणित एकत्रितपणे पाहिले तर दोन तृतीयांश पेक्षा अधिक यश महायुतीला मिळाले आहे असा सहज निष्कर्ष कोणीही काढू शकतो. पण ठिकठिकाणच्या या विजयामागचे नेमके कारण लक्षात घेतले तर हे भाजपाचे वैयक्तिक यश नाही हे सहज लक्षात येते तसेच या निवडणुकीत महायुतीचे तीनही पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले त्यामुळे या तीनही पक्षांची एकत्रित गोळाबेरीज करून महायुतीच्या यशाचे गणित मांडणे संयुक्त ठरत नाही. त्यातही भाजपाच्या निवडणूक चिन्हावर निवडून आलेल्या उमेदवारांच्या नावावर जर आपण नजर टाकली तर यातले जवळपास ऐंशी टक्के उमेदवार पूर्वीच्या राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस पक्षाचेच असल्याचे लक्षात येते.

या निवडून आलेल्या भाजपच्या एकूण सदस्यांपैकी एका अंदाजानुसार जेमतेम वीस ते पंचवीस टक्के उमेदवारच मूळ भाजपचे आहेत. आज सोशल मीडियावर भाजपच्या काही नाराज लोकांकडून ज्या पोस्ट आल्या आहेत त्यात भाजपच्या चिन्हावर निवडून आलेल्या लोकांपैकी तब्बल ९० टक्के लोक बाहेरच्या पक्षांचे आहेत असे नमूद करण्यात आले आहे. भाजपाचा मूळ कार्यकर्ता आजही केवळ सतरंज्या उचलण्याचेच काम करीत आहे आणि सत्तेचा मलिदा बाहेरून आलेले लोक चाखत आहेत अशी नाराजीही या पोस्टमध्ये व्यक्त केलेली दिसली. भाजपाने बाहेरची माणसे घेऊन स्वतःचा पक्ष वाढवला आणि आपल्या पक्षाचे प्रभुत्व प्रस्थापित केले हे लोकांना स्पष्ट दिसते आहे. त्यामुळे नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर उपऱ्या लोकांनीच वर्चस्व गाजवले हा आरोप अगदीच बिनबुडाचा नाही. अर्थात, राजकारणात जो जीता वही सिकंदर असे म्हणण्याची प्रथा आहे, त्यामुळे भाजपच्या यशामागचे इंगित काहीही असले तरी दृश्य स्वरूपात भाजपने राज्यात आपला प्रभाव निर्माण केला आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. भाजपामध्ये होणारी इनकमिंग आता बंद करा या मागणीसाठी चक्क भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे आपल्याला यापूर्वी पाहायला मिळाले आहे.

सोलापूर जिल्ह्यात घाऊक पद्धतीने राष्ट्रवादीचे माजी आमदार आणि अन्य नेते भाजपमध्ये घेतले गेल्याने तेथे भाजप मुख्यालयात निष्ठावान भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले होते, पण त्याचा पक्षश्रेष्ठींवर काहीही परिणाम झाला नाही. त्यांनी फक्त निवडणुका जिंकण्याचे तंत्र लक्षात ठेवून बाहेरच्या लोकांचे प्रवेश चालूच ठेवले. त्यात मोहोळ जिल्ह्यातील माजी आमदार राजन पाटील यांचाही समावेश होता. त्यांच्या नगरपरिषदेत बिनविरोध निवडणुकीची परंपरा कायम राखत राजन पाटलांनी ती नगरपरिषद जिंकली. त्यांचा विजय हा भाजपचा विजय म्हणून गणला जाऊ लागला, असेच सगळीकडे झाले आहे. आपल्याकडे सासवड नगरपालिकेसह असंख्य ठिकाणी असे प्रकार पाहायला मिळाले आहेत. सासवड नगरपालिकेतील काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि त्यांनी तेथे आपल्या व्यक्तिगत प्रभावाने यश मिळवले. ते यशही भाजपच्या नावावर जमा झाले. अशी एकामागून एक अनेक उदाहरणांची जंत्री आपल्याला पाहायला मिळते. आपण जरी अशी यादी तपासत बसलो तरी भाजपला आज मिळालेल्या यशाला कोणतेही गालबोट लावता येणार नाही. राजकारण हे सत्ता मिळवण्यासाठीच केले जाते, त्यासाठी साम-दाम-दंड भेदाचा वापर केला जातो आणि तेच भाजप करत आली आहे.

महापालिकेच्या निवडणुका आता दोन-तीन आठवड्यांवर आल्या आहेत त्या निवडणुकांवर भाजपने मिळवलेल्या यशाचा प्रभाव निश्चित उमटणार आहेच, पण महापालिका निवडणुकांसाठीही भाजपाने विरोधी पक्षांचे ठिकठिकाणचे शक्तिशाली नेते आणि उमेदवार फोडून अशीच जय्यत तयारी केली आहे. अनेक शहरांमधूनही भाजपच्याच स्थानिक कार्यकर्त्यांनी या इनकमिंगला विरोध दर्शवला पण येथेही या विरोधाचा काही उपयोग झाला नाही. भाजप श्रेष्ठींनी सरसकट इनकमिंग करून मोठी वातावरण निर्मिती केली आहे.

अशा प्रकारातून भाजप पक्ष यंत्रणेत जी नाराजी निर्माण होते ती नाराजी पुण्यातही पाहायला मिळाली. मध्य पुणे, वारजे, खडकवासला अशा ठिकाणच्या भाजपच्या कार्यकर्त्यांनी आणि इच्छुक उमेदवारांनी प्रचारासाठी आणलेले साहित्य फेकून देऊन आपली संपर्क कार्यालय गुंडाळली असल्याचा प्रकारही घडला आहे. इनकमिंगला दिलेल्या अनुमतीमुळे निष्ठावान भाजप कार्यकर्ता जो नाराजी व्यक्त करतो त्याला पक्षात किंचितही किंमत दिली जात नसल्याचाही अनुभव आहे. भाजपाच्या नेत्यांना आता केवळ निवडणुकीतील यशाचीच नशा चढली असून त्यासाठी त्यांना निष्ठावान कार्यकर्त्यांच्या नाराजीकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही, त्यावर आज कोणाकडेही उपाय नाही.

निवडणुका जिंकण्यासाठीचे आपले तंत्रच यशस्वी ठरते हे नगरपालिका आणि नगरपरिषदा निवडणुकीतील यशाने पुन्हा एकदा सिद्ध झाल्याने राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी भाजपचे नेते हेच तंत्र अवलंबणार आणि पुन्हा हाच यशस्वी प्रयोग करून दाखवणार हे निश्चित आहे. या सगळ्या गोष्टींचा आता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आणि सर्वसामान्य मतदारांनीच विचार करायचा आहे.

---

## आ.खोतकर यांनी सीसीआय कापूस केंद्राच्या अधिकाऱ्याला झापलं

जालना । प्रतिनिधी



शेतकऱ्याची अचानक ऑनलाईन नोंदणी रद्द करून रात्री बारा वाजता इंग्रजीमध्ये मेसेज टाकल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली याप्रकरणी शेतकऱ्यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांची भेट घेऊन समस्या सांगितली आणि तात्काळ आमदार अर्जुन खोतकर यांनी सीसीआय केंद्रावरील कर्मचाऱ्याला झापले व तसेच तात्काळ शेतकऱ्यांचा कापूस घेण्याचे आदेश दिले. शेतकऱ्यांना इंग्रजीत आलेला मॅसेज कळतो का? डोकं ठिकाणावर ठेवून का सीसीआय केंद्रावरील कर्मचाऱ्याला आमदार अर्जुन खोतकर यांनी झापले, शेतकऱ्यांना इंग्रजीत आलेला मॅसेज कळतो का? डोकं ठिकाणावर ठेवून काम करा ना? शेतकऱ्यांनी केलेली स्लॉट बुकिंग ऐनवेळी रद्द झाल्याने कर्मचाऱ्यांनी कापूस खरेदीला दिला होता नकार त्यानंतर खोतकर चांगले संतापले शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करा अन्यथा त्या ठिकाणी आमदार भाऊ येऊन बसेल म्हणा, खोतकर यांनी इशारा दिला. सदरील घटना दिनांक २३ डिसेंबर मंगळवार रोजी दुपारी घडली . शेतकऱ्याला न्याय मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी आमदार अर्जुन खोतकर यांचे आभार व्यक्त केले.

## विकास आणि समृद्धीचे प्रतीक बनली बेनसुर ग्रामपंचायत

### घराघरात विकास पोहचविणे हेच माझे लक्ष-सरपंच विद्या गायकवाड

बीड । प्रतिनिधी

**गावचा विकास हेच ध्येय आहे. घराघरात विकास पोहचविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. सर्वांच्या सहकार्याने प्रत्येक घरापर्यंत विकास करण्याचे लक्ष आहे, असे प्रतिपादन सरपंच विद्या गायकवाड यांनी केले.**

एखाद्या ग्रामपंचायतचा कायापालट सरपंचाने मनात आणल्यावर कसा होऊ शकतो याचे बेनसुर ही ग्रुप ग्रामपंचायत ज्वलंत उदाहरण आहे. पाटोदा तालुक्यातील बेनसुर हे २३०० लोकसंख्या असलेले गाव. विविध विकास कामे होत असल्याने समृद्धीचे प्रतीक बनले आहे. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवत ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या दोन्ही गावांच्या प्रत्येक उंबऱ्यापर्यंत आज विकास झाला आहे. सौ.विद्या संतोष गायकवाड या सरपंच झाल्यानंतर अवघ्या तीन वर्षात या गावाने विकासाचा महामार्ग गाठला. घाटेवाडी व रामवाडी या दोन्ही गावांमध्ये प्रत्येक ठिकाणी नागरिकांना अपेक्षित कामे झाली आहेत. मुबलक पाणीसाठा असल्याने पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सर्व गावकऱ्यांना योग्य रीतीने पाणीपुरवठा होत असल्याचे दिसून येते. भविष्यात कधी कोरडा दुष्काळ पडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून तलावाकाठी सार्वजनिक विहीर घेतलेली आहे. त्यामुळे ऐन दुष्काळात देखील मुबलक पाणी सर्व गावकऱ्यांना उपलब्ध होते. तीन वर्षांपूर्वी गावाची अवस्था ही अत्यंत दयनीय झाली होती. बेनसुर ग्रामपंचायत आज समृद्धीकडे वाटचाल करत आहे. मागील तीन वर्षात दोन्ही गावात रस्त्यांचे जाळे निर्माण झाले. दळणवळणाचे साधन तर निर्माण झालेच तसेच नागरिकांना देखील कच्च्या रस्त्यामुळे जो अडचणींचा सामना करावा लागायचा तो आता दूर झाला आहे. दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रस्ते झाल्याने नागरिकांची सोय झाली आहे. रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेली झाडे हे देखील आता गावची शोभा वाढवत आहेत. सन २०२२ मध्ये ग्रामपंचायत बेनसुर निवडणूक जाहीर होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे गावातील सरपंच पदाचे आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी सुटले आणि निवडणूक जाहीर झाली निवडणूक जाहीर झाल्यानंतर लोकनियुक्त सरपंच पदावर सौ.विद्या संतोष गायकवाड या बेनसुर गावच्या सरपंच पदावर विराजमान झाल्या. स्त्री ज्याप्रमाणे आपले घर कायम नीटनेटके ठेवत असते त्याचप्रमाणे सरपंच सौ विद्या गायकवाड यांनी बेनसुर हे ग्रुप ग्रामपंचायत खऱ्या अर्थाने गावचा सर्वांगीण विकास करत सुशोभित केली आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. पिण्याच्या पाण्यासाठी आरो फिल्टर चे पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. गावअंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन हे जिल्हा परिषदेमार्फत काम पूर्ण झालेले आहे, जिल्हा विकास निधीतून शाळा दुरुस्ती, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभ एकूण घरकुल १७७ मंजूर व घरकुल बांधकाम पूर्ण व काही प्रगतीपथावर आहे.अहिल्याबाई होळकर जलसिंचन विहीर वैयक्तिक लाभार्थी साधारण ३० मंजूर काम पूर्ण व काही प्रगती पथकावर आहे. गावअंतर्गत १५ वित्त आयोगातून मागासवर्गीय वस्तीसाठी पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र बोरवेलची सोय करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना या गावात प्रभावीपणे राबवण्यात आलेले आहेत. सरकारच्या प्रत्येक योजनेचा फायदा तळागाळातील लोकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचावा यासाठी सरपंच सौ. विद्या गायकवाड या कायम प्रयत्नशील आहेत. उपसरपंच व सदस्य हे देखील सहकार्य लाभले आहे. ग्रामपंचायत अधिकारी कराड हे अभ्यासू अधिकारी मिळाले असल्याचे सरपंचांनी सांगितले.



## महानगरपालिका निवडणूक: पहिल्याच दिवशी ८०४ अर्जाची नामनिर्देशन पत्रांची विक्री

जालना ।प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २०२५ पासून नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण १५ विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांची आधीच नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या पाचही कार्यालयांमध्ये आज सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पहिल्याच दिवशी एकूण ८०४




नामनिर्देशन पत्रांची विक्री झाली आहे. मात्र, अद्याप एकही अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेला नाही. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व पाचही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जातील. अर्ज विक्रीची अंतिम मुदत ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंतच असणार आहे, याची इच्छुकांनी नोंद घ्यावी. निवडणूक प्रक्रियेचा भाग म्हणून मतदार याद्या आणि बेबाकी ( ) प्रमाणपत्र वितरणाचे कामही युद्धपातळीवर सुरू आहे: मतदार यादी: आजपर्यंत जालना महापालिकेमार्फत २१६ अंतिम मतदार याद्यांची विक्री करण्यात आली आहे. बेबाकी प्रमाणपत्र: एकूण प्राप्त अर्जांपैकी ३४४ उमेदवारांना आतापर्यंत बेबाकी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. उर्वरित ८५० प्रकरणांपैकी ४०० प्रमाणपत्रे तयार असून, त्यांचे वितरण लवकरच केले जाणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यापूर्वीच विविध समित्यांचे गठन केले असून, यामध्ये आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था आणि ईव्हीएम व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विभागांचा समावेश आहे. सर्व नोडल अधिकाऱ्यांना आपापल्या जबाबदाऱ्या तातडीने पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## धक्कादायक : रेशनच्या गहू, तांदळात सोनकिडे

अहिल्यानगर । प्रतनिधी

**शासनाकडून नागरिकांना मिळणाऱ्या रेशन धान्यात मोठ्या प्रमाणात सोनकिडे, कचरा, बारीक चुर निघत असल्याने हे धान्य जनावरांना खाऊ घालण्याची वेळ आली आहे. वाळकी गणातील लाभार्थ्यांना रेशन धारकांकडून या धान्याचे वितरण झाले असून, नागरिकांच्या आरोग्याच्या जिवाशी पुरवठा विभाग खेळत असल्याने लाभार्थ्यांतून संताप व्यक्त केला जात आहे.**

याविरोधात आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते राहुल बहिरट यांनी दिला आहे. जल्ह्यातील गोरगरिब, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या नागरिकांना केंद्र शासनाकडून अंत्योदय योजनेतून महिन्याला ३५ किलोंचे धान्य मोफत मिळते. यात गहू व तांदुळ याचा समावेश असतो. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या या धान्याचे वितरण राज्य शासनाच्या पुरवठा विभागामार्फत केले जाते. धान्य वितरण प्रणाली व लाभार्थ्यांना धान्य योग्य प्रमाणात मिळते की नाही, याची सर्व जबाबदारी जिल्हा पुरवठा विभागावर आहे. दर महिन्याला सर्व रेशन दुकानदारांकडून धान्याचे वाटप करण्यात येते. या महिन्यात वाळकी गणातील गावांमध्ये रेशन धान्याचे वाटप करण्यात आले असून, हे धान्य निकृष्ट प्रतीचे असल्याने लाभार्थ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तांदुळ व गव्हाला सोनकिडे लागले आहे. धान्याची बारीक चूर झाली असल्याने हे धान्य खायचे कसे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. निकृष्ट प्रतीचे धान्य देऊ त्यांची चेष्टा चालविली आहे. रेशन दुकानदारांकडे तक्रार करून धान्य बदलून मिळाले नसल्याने सामाजिक कार्यकर्ते बहिरट यांनी पुरवठा विभागावर संताप व्यक्त केला आहे. खराब धान्याचा पुरवठा बंद करून चांगले धान्य द्यावे, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

---

## पान १ वरून...

### नोंद न झालेल्या पिकांची

चौकशी करून पीक नोंदणीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती दर्शक पंचनामा करून शेताच्या बांधाला लागून असलेले इतर शेतकऱ्यांचे जाब जबाब नोंदविण्यात येतील. ज्या शेतकऱ्यांची पीक नोंदणी गाव नमुना नंबर १२ वर यापूर्वी प्रतिबिंबित झालेली नाही त्या शेतकऱ्यास संदर्भात वरील प्रक्रिया अवलंबविण्याची गरज आहे. यासाठी ज्या शेतकऱ्यांची ऑनलाईन पीक पाहणी होऊ शकली नाही त्या शेतकऱ्यांनी ऑफलाईन पाहणीसाठी नोंद करावी, असे आवाहन महसूल आणि कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

--------------

### ठाकरे बंधूंच्या युतीची

महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकांतील शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जागावाटप अद्याप अंतिम झाले नसले तरी बुधवारी (दि. २४) दुपारी १२ वाजता युतीची घोषणा होणार आहे. खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर पोस्ट करून या संदर्भात माहिती दिली. दरम्यान, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवसेनेला १०० पेक्षा अधिक जागा, मनसेला ६० ते ७० जागा आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १५ ते २० जागा मिळण्याची शक्यता आहे. मराठी बहुल भागातील ५० टक्के जागांवर शिवसेना आणि ५० टक्के जागांवर मनसे लढेल, असे नियोजन आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या बंधुंची युती झालेलीच आहे. मनसे आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी युती स्वीकारलेली असून कोणताही संभ्रम नाही. फक्त घोषणा करायचा विषय आहे, असे राऊत यांनी तत्पुर्वी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. मुंबई आणि इतर पालिकेत कार्यकर्त्यांकडून सोबत काम करायला सुरुवात झाली आहे, तशा सूचना दिल्या आहेत. युती झाली आहे, फक्त जागावाटवपाबाबत शेवटची भेट झाली आहे. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊन घोषणा करतील. नाशिकमध्ये चर्चा आटोपली आहे. पुणे, ठाणे, मीरा भाईंदर, कल्याण, डोंबिवली या ठिकाणी जागावाटप झाले आहे, असेही राऊत यांनी सांगितले.

-----------

### वाल्मिक कराडसह त्याच्या गँगवर

आरोपींकडून तीच तीच कारणे न्यायालयापुढे मांडण्यात येत होती. न्यायालयाने प्रत्येक आरोपीला विचारले की, तुमच्याविरुद्ध जे आरोप ठेवण्यात आलेले आहेत ते मान्य आहेत का? त्यावर आरोपींनी आरोप मान्य नसल्याचे सांगितले. न्यायालयाकडून हे रेकॉर्ड तुरुंगात पाठवण्यात येईल. तुरुंगातून त्यावर स्वाक्षरी झाल्यानंतर पुन्हा खटल्याच्या कामाला सुरुवात होईल, असे ते म्हणाले. उच्च न्यायालयाने आरोपीनिश्चितीसाठी कुठेही स्थगिती दिलेली नाही. त्यांनी काल तसा प्रयत्न उच्च न्यायालयात केला होता. पण उच्च न्यायालयाने त्यांना तोंडी नकार दिल्याचे ॲड. निकम यांनी नमूद केले. मंगळवारी सर्व आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण केले होते. त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणाने राज्यभर खळबळ उडाली होती. देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाले आहे.

--------------

### जालन्याचा तोतया आएएस

अधिकारी असल्याचे सांगून मंदिरात दर्शनासाठी जाण्याचा प्रयत्न केला होता. प्राथमिक चौकशीत संबंधित व्यक्तीने विविध ठिकाणी बनावट ओळखपत्राचा वापर करून लोकांची फसवणूक केल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून या घटनेने तुळजापूरात खळबळ उडाली आहे.

------------

### मुंबई काबीज करण्यासाठी

बाऊन्स बॅक करणं खूप जड जाण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. त्यामुळेच दोन्ही ठाकरे बंधू या निवडणुकीत आपला सगळा जोर लावण्याची शक्यता आहे.

-------------

### मृत्यूपत्राच्या आधारे जमिनीची

आधारावर केलेला दावा आहे, या कारणास्तव महसूल विभाग वारस नोंद नाकारू शकत नाही, असे स्पष्ट करत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करून अशी नोंद मालकी हक्कावरील कोणत्याही दिवाणी खटल्याच्या निकालाच्या अधीन राहील, असेही न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने आपल्या निकालात नमूद केले आहे. मध्य प्रदेशातील मौझा भोपाळी येथील रोडा ऊर्फ रोडीलाल यांच्या मालकीच्या शेतजमिनीबाबत वाद होता. २०१९ मध्ये त्यांचे निधन झाले. ताराचंद्र नावाच्या व्यक्तीने २०१७ मधील नोंदणीकृत मृत्युपत्राच्या आधारे या जमिनीवर स्वतःचे नाव लावण्यासाठी अर्ज केला होता. तहसीलदारांनी सार्वजनिक नोटीस काढली. साक्षीदारांचे जबाब नोंदवून ही वारस नोंद मंजूर केली होती. मात्र, भवरलालने नोंदीला आव्हान दिले. भवरलाल यांचा दावा होता की, त्यांच्याकडे जमिनीचा नोंदणी नसलेला विक्री करार असून त्यांचा जमिनीवर ताबा आहे. उपविभागीय अधिकारी आणि आयुक्तांनी त्यांचे अपील फेटाळले; पण उच्च न्यायालयाने मृत्युपत्राच्या आधारे केलेली नोंद रद्द केली होती. या निर्णयाविरोधात ताराचंद्र यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित केले. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, मध्य प्रदेश भू-राजस्व संहिता, १९५९ मधील कलम १०९ आणि ११० मध्ये जमिनीचे हक्क मिळवण्याच्या पद्धतींवर कोणतेही बंधन नाही. खरेदीखत किंवा भेटवस्तूप्रमाणेच मृत्युपत्र हा देखील मालमत्ता हस्तांतरणाचा एक कायदेशीर मार्ग आहे. महसूल दप्तरी नोंद करण्यासाठी २०१७ च्या नियमावलीत मृत्युपत्राचा स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले की, महसूल दप्तरातील नोंदी या केवळ वित्तीय किंवा कर आकारणीच्या हेतूसाठी असतात. त्यातून मालकी हक्क सिद्ध होत नाही. जर मालकी हक्काबाबत वाद असेल, तर तो दिवाणी न्यायालयात सोडवावा लागेल. मृत्युपत्राच्या आधारे केलेली वारस नोंद अर्जाच्या सुरुवातीलाच फेटाळली जाऊ शकत नाही. जर मृताच्या नैसर्गिक वारसांनी कोणताही आक्षेप घेतला नसेल, तर तिसऱ्या व्यक्तीच्या विरोधासाठी महसूल विभागाने ही प्रक्रिया थांबवू नये, असे खंडपीठाने नमूद केले.

-----------

### पंतप्रधान यांच्या पत्नी जशोदाबेन

वैद्यनाथांचे दर्शन घेतले. जशोदाबेन यांनी नम्रपणे दौरा चांगला घडवल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. १२ ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या वैद्यनाथ मंदिराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आरोग्य निरामय राहण्यासाठी देशभरातून भाविक परळीत वैद्यनाथ दर्शनासाठी येतात. या मंदिरात दर्शन घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी मंगळवारी दुपारी कुटुंबीयांसह आल्या होत्या. पारंपरिक पद्धतीने विधिवत पूजा, अभिषेक त्यांनी केला. ही यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रशासन आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे त्यांनी आभार मानले. यावेळी दर्शनासाठी प्रशासनाने चोख व्यवस्था ठेवली होती. यावेळी त्यांच्यासमवेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बंधू अशोक मोदी हेही उपस्थित होते. प्रभू वैजनाथच्या दर्शनानंतर त्यांनी देशातील नागरिकांसाठी सुख-समृद्धी व जनकल्याणासाठी प्रार्थना केली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### परळीकरांच्या वतीने आत्मीय स्वागत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी, पंतप्रधानांचे बंधू अशोक मोदी व अन्य सर्व नातेवाईकांनी वैद्यनाथ दर्शन घेतल्यानंतर मंदिर परिसरात तमाम परळीकर यांच्या वतीने त्यांचे आत्मीय स्वागत करण्यात आले. यावेळी आ. धनंजय मुंडे यांचे बंधू अजय मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन आत्मीय स्वागत केले.

------------

### पार्थ पवार दोषीच आहेत त्यांच्यावर

केली आहेत. ती दिग्वीजय पाटील व शितल तेजवानींचे वकील तृप्ता ठाकूर यांनीच बाहेर काढली आहेत. असा दावा दमानिया यांनी केला. तसेच डिपार्टमेंट ऑफ रजिस्ट्रेशनचे आयुक्त संतोष हिंगण व तृप्ता ठाकूर यांचे व्हाटसअॅप चॅटही समोर आले आहे. त्यामुळे त्यांचीही चौकशी झाली पाहिजे. या सर्वांना बोलावून चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा कोर्टात जाणार असल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. कायदा सर्वांना समान असतो ही फक्त आपण ऐकले असते कारण कायदा सर्वांना समान नाही हे यावरून दिसते. दिग्विजय पाटलाची मोघम चौकशी सुरू आहे. त्यामुळे यात दोषी लोकांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. पार्थ पवार आणि इतर विषयाची कागदपत्रे आणि पोलिसांना दिली आहेत आणि या न्यायालयाच्या निर्णयानुसार गुन्हा दाखल करा असे म्हटले आहे, अशी माहिती विजय कुंभार यांनी दिली.

--------------

### शिक्षक भरती घोटाळ्यात आणखी

उपसंचालक, शिक्षण अधिकारी, लिपिक, शाळेचे मुख्याध्यापक, शाळा संचालक आणि शिक्षक यांचा समावेश आहे. सर्व आरोपींविरुद्ध प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक १० मध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.आरोपी रवींद्र शंकरराव काटोलकर यांना मंगळवारी अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर त्यांना २५ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. २०२१ ते २०२२ दरम्यान नागपूर जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी पदावर असताना, बनावट विद्यार्थी ओळखपत्रांची माहिती असतानाही त्यांनी कोणत्याही चौकशीशिवाय पगार प्रस्ताव मंजूर केले आणि वैयक्तिक फायद्यासाठी त्यांनी सरकारचे नुकसान केलं.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५
३

## थोडक्यात

### मातोरी येथे आज महंत शंकर महाराज यांचे कीर्तन

फुलसांगवी । प्रतिनिधी

मातोरी येथील रहिवासी असलेले कै. अशोक तात्याराम जरांगे यांचे आज प्रथम वार्षिक पुण्यस्मरण असून या निमित्ताने श्री.क्षेत्र भालकेश्वर संस्थांनचे मठाधिपती हभप. महंत शंकर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.






शिरूर कासार तालुक्यातील मातोरी येथील रहिवासी असलेले कै. अशोक तात्याराम जरांगे यांचे एक वर्षांपूर्वी अपघाती निधन झाले होते. अशोक जरांगे यांचा तालुक्यामध्येच नव्हे तर जिल्ह्यामध्ये मोठा जनसंपर्क होता. त्यांच्या अकाली निधनामुळे केवळ परिवारावरतीच नव्हे तर संपूर्ण मातोरी गावा वरती दु:खाचा डोंगर कोसळला होता. त्यांच्या निधनाला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. प्रथम वार्षिक पुण्यस्मरणाच्या निमित्ताने बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी जरांगे यांच्या मातोरी येथील निवासस्थानी सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये श्री.क्षेत्र भालकेश्वर संस्थानचे मठाधिपती हभप. शंकर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर पंचक्रोशीतील संत महंतांचे ही पूजन करण्यात येणार आहे.तरी कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील भाविक- भक्तांसह, नातेवाईक, मित्रपरिवार, गावकरी मंडळी यांनी कार्यक्रमाचा लाभ घेऊन स्नेहभोजनास उपस्थित राहावे असे अवाहन अनिल तात्याराम जरांगे(भाऊ) सूर्याश अशोक जरांगे(मुलगा) यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### आ.सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद देवुन त्यांचा सन्मान करावा -प्रशांत सावंत

वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख असलेले आमदार प्रकाशदादा सोळंके यांची जनतेने सलग पाचव्यांदा आमदार म्हणून निवड केली आहे. ही निवड जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास, त्यांच्या कार्यकौशल्याची पावती व त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक-राजकीय योगदानाची साक्ष देणारी आहे. पुढील विकासासाठी प्रकाश दादा सोळुंके यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन त्यांचा सन्मान करावा अशी मागणी मा पंचायत समिती सभापती प्रशांत बापू सावंत यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.



माननीय अजित दादा पवार यांचे विश्वासू तथा बीड जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते सलग पाच टर्म आमदार असणारे प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, सिंचन,रोजगारनिर्मिती तसेच सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने ठोस भूमिका घेतली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी नेहमीच सक्रिय प्रयत्न केले असून पक्षसंघटन मजबूत करण्यातही मोलाची भूमिका बजावली आहे. माजलगाव मतदारसंघ हा ग्रामीण व अर्धग्रामीण स्वरूपाचा असून येथील प्रश्नांची जाण असलेले अनुभवी नेतृत्व राज्य मंत्रिमंडळात असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना कॅबिनेट मंत्रीपद दिल्यास मराठवाड्याच्या विकासाला निश्चितच गती मिळेल, असा सर्वसामान्य कार्यकर्ते व जनतेचा विश्वास आहे. तरी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच माजलगाव मतदारसंघ व मराठवाड्याच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मा. आमदार प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे, अशी मागणी वडवणी मा पंचायत समिती सभापती प्रशांत बापू सावंत यांनी यांनी केली आहे.

## शेतमजूर युनियनने मनरेगा रद्दीकरणाचा केला विरोध

**माजलगाव । प्रतिनिधी**

**ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील (मनरेगा) मूलभूत बदलांमुळे ग्रामीण गरीब व शेतमजूर यांच्या हितसंबंधांवर घाला घातला जात आहे, असा आरोप करून महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा) च्या बीड जिल्हा समितीने सोमवारी माजलगाव चे तहसीलदार रुईकर यांच्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन सादर केले.**




### तहसीलदारांकडे निवेदन सादर

केंद्र सरकारने २००५ चा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हम्मी कायदा (मनरेगा) रद्द करून त्याऐवजी विकसित भारत- रोजगार व आजीविका मिशन (ग्रामीण) - () हे नवीन विधेयक संसदेत सादर केले आहे. या नव्या विधेयकातील विशेषतः तीन बदलांवर तीव्र टीका केली गेली आहे:

नव्या कायद्यानुसार, पेरणी-कापणीच्या हंगामात राज्य सरकारने ६० दिवस मनरेगा काम बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतीचा मंद हंगाम असतानाच ग्रामीण मजूर रोजगारासाठी मनरेगा कडे वळतात. ही बंदी त्यांच्या रोजगारावरचा प्रत्यक्ष हल्ला आहे.

त्याचबरोबर आतापर्यंत मनरेगा खर्चाचा ९०% वाटा केंद्राकडून उचलला जात होता. नव्या कायद्याने हे प्रमाण ६०:४० असे बदलले आहे, ज्यामुळे राज्यांवर अतिरिक्त आर्थिक ओझे येणार आहे. जुना कायदा कामाचा हक्क मानायचा, तर नवा कायदा केंद्र सरकारला प्रत्येक राज्यासाठी पूर्वनिर्धारित बजेट ठरवण्याचा अधिकार देतो. यामुळे रोजगार हा लोकांच्या मागणीऐवजी दिल्लीत ठरवलेल्या निधीवर अवलंबून राहील, अशी युनियनची भीती आहे. नव्या कायद्यात राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅक द्वारे केंद्र सरकार कामे व प्राधान्यक्रम ठरवेल. ग्रामसभेची नियोजनातील सार्वभौमिकता संपुष्टात येईल. आधार, बायोमेट्रिक्स, जिओ-टॅगिंग या तंत्रज्ञानाच्या नावाखाली लाखो गरीब मजूर योजनेबाहेर फेकले जातील. कामाचे तास ७ वरून ८ व आणि १२ पर्यंत वाढवण्याची तरतूद हा मजुरांच्या शोषणाला कायदेशीर मंजुरी देण्यासारखे आहे. मनरेगा ही केवळ रोजगार योजना नव्हती, तर ग्रामीण गरीबांचा सन्मान, ताकद व सामाजिक सुरक्षेचा पाया होता. कोविडकाळात त्याने देशाचे प्राण वाचवले. नविन बील हे ग्रामीण गरीब, शेतमजूर, दलित, आदिवासी, स्त्रिया यांच्या हक्कांवर, रोजगारावर व आजीविकेवरचा हल्ला आहे. हे विधेयक रद्द करावे व मूळ मनरेगा कायद्याची मजबूत अंमलबजावणी करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा) युनियनचे बळीराम भुंबे, शिवाजी कुरे, पांडुरंग उबाळे, शेषराव अबुज, किसान सभेचे कृष्णा सोळंके हे कार्यकर्ते उपस्थित होते.

## युसूफवडगांव विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल नुकतीच पार पडली या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील विविध धार्मिक स्थळे,ऐतिहासिक गडकोट व पर्यटन स्थळांना भेट दिली.**



नुकतेच युसुफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न झाली. ही शैक्षणिक सहल युसूफवडगांव-पंढरपूर-कोल्हापूर(महालक्ष्मी मंदिर-रंकाळा तलाव-शाहू पॅलेस)जोतिबा मंदिर-पन्हाळा किल्ला-नाणीजधाम-गणपतीपुळे-प्रतापगड-महाबळेश्वर-पुणे येथील प्रति बालाजी मंदिर-नारायणपुर दत्त मंदिर-जेजुरी गड व मोरगाव गणपती अशा ऐतिहासिक धार्मिक नैसर्गिक भौगोलिक ठिकाणांना भेटी देऊन त्या ठिकाणची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली.

या शैक्षणिक सहलीत इयत्ता नववी व दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.यात ४० मुली व ४० मुले अशी एकूण ८० विद्यार्थी व विद्यार्थ्यांसमवेत ०८ शिक्षक होते.यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या दोन बसेस उपलब्ध होत्या.या शैक्षणिक सहली समवेत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.अंकुश भोसले,श्री बसलिंग गडकर,श्री बत्तास मुकदम,श्री गलांडे सर,श्री सुंकावार सर,श्री गंगणे सर,सौ माने मॅडम व सहल विभाग प्रमुख श्री चौधरी सर सहभागी होते.ही शैक्षणिक सहल अत्यंत उत्साहात आनंदात संपन्न झाली.शैक्षणिक सहल यशस्वी पणाने पार पाडल्याबद्दल संस्थेचे सचिव दीपक घुमरे,संस्थाध्यक्ष सुकाळे यु बी,शाळेचे मुख्याध्यापक अंकुश भोसले सर सर्व पालकांनी व शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## पान ६ वरुन...

### अजितदादा बीडमध्ये

उपस्थित होत आहे. निकृष्ट ज्वारी पाहण्यासाठीही त्यांच्याकडे वेळ नाही का? असा रोष नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणी अनेक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदने सादर केली आहेत.

निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, बीड जिल्ह्यातील सर्वच स्वस्त धान्य दुकानांमध्ये पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून निकृष्ट दर्जाची ज्वारी वाटप करण्याचा दबाव टाकण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ही ज्वारी मानवास तसेच जनावरांसाठीही खाण्यायोग्य नसून, तिच्या खरेदी-विक्री प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### फुलसांगवीतील घरकुल

वाळूची वाटप केली जात आहे. गेल्या तीन दिवसांमध्ये ७० ब्रॉस वाळूची वाटप झाली आहे. या कामी मंडळधिकारी ठाकूर व तलाठी गोरडे यांना सरपंच भास्करराव सानप, उपसरपंच अजिनाथ तळेकर,सामाजिक कार्यकर्ते गणेश(अण्णा) तळेकर यांची मोठी मदत मिळत आहे. तर लाभार्थी ही आपल्याला शासनाच्या वतीने मिळणारी मोफत वाळू घेऊन जाण्यासाठी सरसावले आहेत. तरी उर्वरित फुलसांगवी गावातील घरकुल लाभ धारकांनी शासनाच्या वतीने देण्यात येत असलेले मोफत वाळू वाटपाचा वेळीच लाभ घेऊन आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करावे असे अवाहन मंडळधिकारी निशांत ठाकूर आणि तलाठी राहुल गोरडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### डॉ.ज्योती घुंबरे यांच्याकडून

भाजपचे सर्व नगरसेवक एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ.रविंद्र घुंबरे, नरेंद्र घुंबरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बीडच्या विकासासाठी भाजपचे नगरसेवक सक्षमपणे काम करतील : डॉ.ज्योती घुंबरे

माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येक मतदाराचे, कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकाचे मी मनापासून आभार मानते. निकाल काहीही असला, तरी या निवडणुकीतून भाजपची ताकद दिसून आली. शहरातून भारतीय जनता पक्षाचे १५ नगरसेवक निवडून आले असून, शहराच्या विकासासाठी भाजप सक्षमपणे काम करेल, याची मला पूर्ण खात्री आहे, असेही डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या.

### शाळा आता मनमानी

असलेल्या शाळांची नावे तत्काळ बदलण्याची मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.हा निर्णय महाराष्ट्र राज्यातील राज्य शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील सर्व शाळांना लागू झाला आहे. विशेषतः ज्या शाळांनी आपल्या नावांमध्ये ग्लोबल, इंटरनॅशनल, सीबीएसई किंवा इंग्लिश मीडियम यांसारख्या शब्दांचा गैरवापर केला आहे.

हा निर्णय संचालनालयाने घेतला असून, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षक यांना याबाबत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत

नावांमध्ये दिशाभूल करणारे शब्द आढळल्यास, संबंधित शाळा व्यवस्थापनांना तात्काळ नाव बदलण्यास सांगितले जाणार आहे. नव्याने मान्यता मागणाऱ्या किंवा दर्जावाढीसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळांच्या नावांची काटेकोर तपासणी केली जाईल. पालकांवर प्रतिकूल परिणाम होईल अशी नावे आढळल्यास, ती बदलल्यानंतरच शिफारस केली जाईल

## शिवाजी विद्यालयाच्या दहावी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर उत्साहात

बीड । प्रतिनिधी

श्री शिवाजी विद्यालय बीड. या शाळेची दहावी वर्गाची बॅच १९८५ यांचा गेट-टुगेदर कार्यक्रम आज दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. काळाच्या ओघात विखुरलेले सवंगडी जेव्हा चार दशका नंतर पुन्हा एकदा एकत्र येतात. तेव्हा तो केवळ एक स्नेह मेळावा होत नाही तर तो भावनांचा एक महासागर होतो. आपल्या लाडक्या गुरुजनांच्या उपस्थितीत शालेय जीवनातील सोनेरी आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे माजी मुख्याध्यापक बहिर सर होते तर प्रमुख पाहुणे गुरुजन मस्के सर, उदावंत सर, बिवरे सर, डोंगरे सर, बोरखडे सर, श्रीमती शिंदे मॅडम ,मातकर सर, वाघमारे सर ,स्वामी सर हे उपस्थित होते.



प्रथम खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या प्रार्थने नंतर मान्यवराचा हस्ते सरस्वती पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व ज्ञानेश्वराची मूर्ती देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविका नंतर अजित डुंगरवाल, क्रांती हांगे, नागेश देशमुख, आसाराम शेटे, अनंत पानभाते ,आनंद शेरकर ,रमेश नागापुरे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर बिवरे सर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा चाळीस वर्षानंतर माझ्या विद्यार्थ्यांनी सन्मान व स्नेह मिलनाचा कार्यक्रम केला अशा या कार्यक्रमाची नोंद गिनिज बुकात झाली पाहिजे. आपणास सर्वांना येणारा प्रत्येक क्षण व दिवस तुमच्या मनासारखा असावा. जीवनात कधीच दु:खांचा एक क्षण ही नसावा म्हणजे तुमच्या मनी असेल ते मिळावे तुमच्या प्रयत्नांना यश मिळत राहोअशा सदिच्छा व्यक्त केल्या. यानंतर श्रीमती शिंदे मॅडम, मस्के सर ,मातकर सर ,वाघमारे सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात बहिर सर म्हणाले, '' माझे हे विद्यार्थी-विद्यार्थिनी माझ्यासमोर लहान होती. पण आता वेगवेगळ्या क्षेत्रात खूप मोठी झाली आहेत .याचा मला खूप अभिमान आहे''. भावी आयुष्यासाठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.दुपारच्या सत्रात सुधन्वा पत्की ,नितीन देवडीकर ,अतुल संघानी ,संजय घायाळ, शिवाजी शिवनीकर ,प्रमोद मुळे, कृष्णा कुलकर्णी, अविनाश मठपती आशा पतंगे, उल्का पांडव, सविता अष्टपुत्रे ,सुषमा मोरगावकर यांनी अभिनय गीत नृत्य अशा विविध कलेचे सादरीकरण केले. समारोपाच्या सत्रात बिवरे सरांच्या हस्ते सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय घायाळ यांनी केले. तर प्रास्ताविक अतुल संघाने यांनी केले. आभार राजकुमार कागदे यांनी मांडले हा स्नेह भेट कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मीकांत खडकीकर, विठ्ठल वाघीरकर ,राजेश भुसारी, रवी पालीमकर ,प्रकाश मानूरकर,प्रशांत पाठक, महिंद्र मेखे ,प्रसाद लिंबेकर, उल्का पांडव, सविता अष्टपत्रे, रोहिणी चिंचोलकर ,सरला बिंदू, शालन देशपांडे यांनी प्रयत्न केले .शेवटी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## 'किमान कौशल्य विकास कार्यक्रम' राबविण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत जिल्ह्यातील अधिक मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासासाठी 'किमान कौशल्य विकास कार्यक्रम' ही जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध विशिष्ट अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (), सेक्टर स्किल कौन्सिल (), नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन () तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था () यांनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांद्वारे राबविले जाणार आहे.

सदर कार्यक्रमासाठी १५ ते ४५ वयोगटातील उमेदवार पात्र असून इच्छुक उमेदवारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड या कार्यालयाशी दि. २६ डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन समाधान किरवले, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी केले आहे.

## आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहांतर्गत मंडळ स्तरीय आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

पाली महसूल मंडळात आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही केवळ प्रशासकीय औपचारिकता न राहता थेट जनतेशी संवाद साधणारी , विश्वास निर्माण करणारी आणि शासन प्रशासन जनता या त्रिसूत्रीला बळ देणारी ठरली . ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात शेतकरी , ग्रामस्थ , लोकप्रतिनिधी , महसूल व इतर विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . '' प्रशासन गावाकडे '' या संकल्पनेचा प्रत्यय देत समस्या ऐकणे , मार्गदर्शन करणे आणि तात्काळ उपाययोजना सुचवणे हा या बैठकीचा केंद्रबिंदू ठरला .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार महसूल विभागाचे निर्णय हे केवळ कार्यालयापुरते न राहता थेट गावपातळीवर पोहोचावा , सामान्य नागरिकांच्या समस्या गावातच सोडवाव्यात , हा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे . त्याच अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागभर सुसाशन सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे .

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे सातत्याने या उपक्रमाचा आढावा घेत असून , जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात लोकाभिमुख प्रशासन पोहोचावे , नागरिकांना वेळेत सेवा मिळावी , यासाठी त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही वेळोवेळी बैठका घेऊन , महसूल यंत्रणेला जनतेशी थेट संवाद साधण्याच्या सूचना दिल्या असून , त्याचाच प्रत्यय या मंडळ स्तरीय बैठकीतून आला .

या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . त्यांनी औपचारिक भाषणांऐवजी थेट लोकांमध्ये बसून शेतकरी व ग्रामस्थांच्या अडीअडचणी ऐकून घेतल्या . पाणी , शेती , महसूल दाखले , ओळखपत्रे , विविध योजना , अनुदाने , ॲग्रीस्टॅक , पीकविमा , जमीन विषयक प्रश्न यावर त्यांनी शांतपणे आणि मुद्देसूद मार्गदर्शन केले . त्यांच्या या लोकाभिमुख भूमिकेमुळे बैठकीला वेगळीच उंची प्राप्त झाली.या आढावा बैठकीस सरपंच सुशेन खरसाडे ( आहेर वडगाव ) , सरपंच रमेश भोसले ( कोल्हारवाडी ) , उपसरपंच अभिराज रांजवन ( आहेर वडगाव ) , उपसरपंच अशोक सिंघन ( कोल्हारवाडी ) , बाबुराव गोरे ( सदस्य , समनापुर ) हे लोकप्रतिनिधी उपस्थित होते . तसेच पोलीस पाटील सखाराम काटे ( आहेर वडगाव ) , अंगद गोरे ( समनापुर ) , अरुण काटे ( राशन दुकानदार , आहेर वडगाव ) , गिरजाप्पा रोहिटे , मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड




( पाली ) , जितेंद्र शेळके ( आहेर वडगाव ) , राजाभाऊ गायकवाड ( मोची पिंपळगाव ) , राधिका बहिर ( वांगी ) , मीनल खांदे ( कोळवाडी ) , कृषिसहाय्यक सरिता शिंदे , आशा सेविका तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.सुसाशन सप्ताहाच्या निमित्ताने शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती देण्यात आली . तसेच प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे लाभार्थ्यांना थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा समाधानाचा भाव हा या कार्यक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला .

या लोकाभिमुख उपक्रमाचे वर्णन करताना एका ग्रामस्थाने म्हटले

प्रशासन म्हणजे कागद नव्हे ,
ते माणसाशी बोलणारे मन असते
.

जेव्हा अधिकारी गावात येतो ,
तेव्हा शासन गावकऱ्यांचे होते .

बैठकीदरम्यान उपस्थित ग्रामस्थांकडून आलेल्या प्रतिक्रिया विशेष लक्षवेधी ठरल्या . एका ज्येष्ठ ग्रामस्थाने सांगितले की , '' आमच्या आयुष्यात पहिल्यांदाच तहसीलदार साहेब थेट गावात येऊन आमच्याशी बसून बोलले . याआधी तहसीलदार म्हणजे फक्त कार्यालयात दिसणारा अधिकारी होता ; आज तो आपल्यातलाच वाटला . ''

दुसऱ्या एका शेतकऱ्याने समाधान व्यक्त करत सांगितले की , '' आज महसूल विभागाचं कामकाज ' एकच कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह ' असं झालं आहे . अडचण सांगितली आणि तिथेच उपाय मिळाला . ''

तर एका ग्रामस्थाने विशेष उल्लेख करत सांगितले की , '' मंडळ अधिकारी शीतल चाटे या नागरिकांची समस्या शांतपणे ऐकून घेतात आणि तात्काळ निराकरण करतात . त्यामुळे लोकांचा प्रशासनावर विश्वास वाढला आहे . ''

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपस्थितांना संबोधित करत सांगितले की , शासनाचे आदेश , वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि स्थानिक पातळीवरील अंमलबजावणी या तिन्हींचा समन्वय साधूनच खरे सुसाशन साध्य होऊ शकते . '' प्रशासन लोकांसाठी आहे . प्रत्येक शेतकरी , प्रत्येक नागरिक हा केंद्रबिंदू मानून काम करण्याची हीच खरी लोकशाही आहे , '' असे त्यांनी स्पष्ट केले .

बैठकीच्या शेवटी सर्व ग्रामस्थ , लोकप्रतिनिधी आणि उपस्थित नागरिकांनी तहसीलदार शेळके तसेच संपूर्ण महसूल यंत्रणेचे आभार मानले . सुसाशन सप्ताहाच्या निमित्ताने पाली महसूल मंडळात झालेली ही बैठक प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करणारी , विश्वास दृढ करणारी आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श ठरल्याचे सर्वसाधारण मत व्यक्त करण्यात आले .

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७३८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १६/१२/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- संजय मोतीलाल कुमार

प्रकरण : सर्वे नं -१२ प्लॉट नं- ४७ सिटी सर्वे नं- १८६७/ब/५५ न.प. मि.नं-१८-१८५-४७ व प्लॉट नं.४८ सिटी सर्वे नं.१८६७/५६ न.प.मि.नं.१८-१८५-४८ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१८५-४७/१८-१८५-४८ दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं.४८ मधील भाग
पश्चिम :- प्लॉट नं.४७ मधील भाग
दक्षिण :-१२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर प्लॉट नं - कॉलनी अंतर्गत रस्ता व ओपन स्पेस

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# उद्याच्या शेतकरी हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## सोयाबीन,तूर,कापसाच्या भाव वाढीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरुवारी मोर्चा धडकणार!

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात असून शेतीमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गुरुवार दि.२५ डिसेंबर२०२५ रोजी सकाळी ११वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, ते बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य शेतकरी हक्क मोर्चा काढण्यात येणार असल्याचे समितीचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे ,कुलदीप करपे डॉ. गणेश ढवळे




,गणेश मस्के ,सुहास जायभाय,अर्जुन सोनवणे, राजू गायके,अण्णासाहेब राऊत यांनी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत शेतकऱ्यांच्या कापसाला किमान ₹१२०००/- प्रति क्विंटल भाव देण्यात यावा. सोयाबीनसाठी किमान ७००० प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा. हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाचा विक्रीदर व खरेदीदरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा.

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, सबसिडी, ठिबक, तुषार सिंचन अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## तुरीचे उत्पादन वाढवण्यासाठी असे उपाय करा

तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ करता येते.

तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या : दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.


शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.इतर महत्त्वाच्या गोष्टी : सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.



## ब्रोकोली लागवड: एक फायद्याची शेती



ब्रोकोली ही एक लोकप्रिय आणि पौष्टिक भाजी आहे जी भारतात वाढत्या प्रमाणात लागवड केली जात आहे. ब्रोकोलीची लागवड हा एक फायद्याचा व्यवसाय असू शकतो, परंतु त्यासाठी योग्य ज्ञान आणि तंत्रांची आवश्यकता आहे.

हवामान आणि जमीन : ब्रोकली थंड हवामानात चांगली वाढ करते. त्याची लागवड १० ते २५ अंश सेल्सिअस तापमानात करावी लागते. ब्रोकोलीची लागवड कोणत्याही प्रकारच्या जमिनीत करता येते, परंतु मध्यम जमीन चांगली असते. जमिनीचा ५.५ ते ६.५ च्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

रोपे तयार करणे : ब्रोकलीची रोपे नर्सरीमध्ये तयार केली जातात. रोपे तयार करण्यासाठी, ब्रोकलीच्या बियाण्याची पेरणी २०० ते ३०० चौरस मीटर आकाराच्या नर्सरीमध्ये करावी. रोपे तयार होण्यासाठी ४ ते ६ आठवडे लागतात.

लागवड

ब्रोकलीची रोपे ३० ते ४५ सेंटीमीटर अंतराने लावली जातात. रोपे लावल्यानंतर, त्यांना पाणी द्यावे लागते. रोपे लावल्यानंतर साधारणपणे २ ते ३ पाण्याचे फेरा द्यावे लागतात. ब्रोकोलीच्या झाडा वाढत असताना, त्यांना खताची गरज असते. ब्रोकोलीची लागवड केल्यानंतर २ महिन्यांत त्याची कापणी करता येते.

कापणी आणि विपणन

ब्रोकलीची कापणी फुलांची कळी मोठी आणि हिरवी झाल्यानंतर केली जाते. ब्रोकलीची कापणी हातने किंवा यंत्राने करता येते. कापणी केल्यानंतर, ब्रोकलीची फुलांची कळी स्वच्छ करून बाजारात विकली जातात.

उत्पादन आणि नफा

ब्रोकलीचे उत्पादन हे लागवडीच्या पद्धती, हवामान, जमिनीची गुणवत्ता आणि इतर घटकांवर अवलंबून असते. भारतात, ब्रोकलीचे सरासरी उत्पादन प्रति एकर ४० ते ५० किंटल असते.

ब्रोकलीचा नफा हा उत्पादनाच्या किमतीवर अवलंबून असतो. भारतात, ब्रोकलीची किंमत प्रति किंटल ३५०० रुपयांपर्यंत असते. प्रती एकर उत्पादन ५० किंटल उत्पादन निघणार असे गृहीत धरले तर १ लाख ७५ हजार रुपये उत्पन्न मिळेल.

याप्रमाणे तुम्ही एक एकर शेतीतून प्रत्येकी ३ ते ४ महिन्यात १ लाख ७५ हजार रुपयांचे उत्पादन घेऊ शकता.

ब्रोकोली विकायचे कुठे –

स्थानिक किरकोळ दुकानांमध्ये विक्री हा आणखी एक चांगला पर्याय आहे. स्थानिक किरकोळ दुकानांना विक्री करण्यासाठी, तुम्हाला तुमच्या स्थानिक किरकोळ दुकानांशी संपर्क साधावा लागेल आणि त्यांना तुमच्या उत्पादनाची ऑफर करावी लागेल. किंवा नागपूर आणि पुणे सारख्या ठिकाणी मोठी भाजीपाला मंडी (बाजारात) शेत माल नेऊ शकता.

ब्रोकोली लागवडीतून नफा मिळवण्यासाठी टिप्स योग्य पद्धतीने लागवड करणे, चांगल्या दर्जाचे बियाणे वापरणे, योग्य अंतरावर रोपे लावणे, पाणी आणि खतांचे योग्य व्यवस्थापन करणे, रोग आणि किडींपासून संरक्षण करणे, ब्रोकली ही एक पौष्टिक भाजी आहे जी भारतात वाढत्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. ब्रोकली लागवड हा एक फायद्याचा व्यवसाय असू शकतो, परंतु त्यासाठी योग्य ज्ञान आणि तंत्रांची आवश्यकता आहे.


## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव आणि एकात्मिक नियंत्रण

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते. जाणून घेऊ या सुत्रकृमी रोगाची सुरुवातीची लक्षणे व त्यावर करायचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांच्यामार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो.

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या?

सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण



करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.

पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७७ : कॅप्टन जेम्स कूकने प्रशांत महासागरातील किरितीमती बेटांचा शोध लावला.
१८९२ : भारताचे प्रसिद्ध लेखक बनारसीदास चतुर्वेदी यांचा जन्म.
१८९४ : पहिली वैद्यकीय परिषद कोलकत्ता येथे सुरु झाली.
१९०६ : रेजिनाल्ड फेसेंडेन याने प्रथमच एक कवितावाचन, व्हायोलिनवादन आणि एक भाषण यांचे रेडिओ प्रक्षेपण केले.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची व काळ्यापाण्याची शिक्षा
१९२४ : अल्बानिया या देशाला स्वातंत्र्य मिळाले.
१९५१ : लिबीया हा देश (ईटलीकडून) स्वतंत्र झाला.
१९७९ : सोविएत युनियनने अफगणिस्तानवर आक्रमण केले.
१९८६ : भारतीय ग्राहक दिन.
१९८६ : दिल्ली येथील लोटस टेंपल भक्तांसाठी उघडण्यात आले होते.
१९८९ : मुंबई मध्ये देशातील पहिले मनोरंजन पार्क 'एस्सेल वर्ल्ड' उघडल्या गेले.
१९९९ : काठमांडू येथून नवी दिल्लीला येणार्या 'इंडियन एअरलाइन्स फ्लाईट ८१४' या विमानाचे तालिबानी अतिरेक्यांनी अपहरण करुन ते विमान अफगणिस्तानातील कंदाहार येथे नेले.
२००० : भारतीय बुद्धीबळ खेळाडू विश्वनाथ आनंद यांनी बुद्धिबळातील वर्ल्ड चैंपियनशिप आपल्या नावावर केली.
२००२ : दिल्लीच्या मेट्रोचा शुभारंभ झाला.
२०१४ : अटल बिहारी वाजपेयी आणि मदन मोहन मालवीय यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली.
२०१६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवस्मारकाचे जलपूजन आणि भूमिपूजन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११६६ : जॉन – इंग्लंडचा राजा (मृत्यू: १९ आक्टोबर १२१६)
१८१८ : जेम्स प्रेस्कॉट ज्यूल – ऊर्जेच्या संक्रमणाविषयी सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थ वैज्ञानिक (मृत्यू: ११ आक्टोबर १८८९)
१८८० : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या – स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (मृत्यू: १७ डिसेंबर १९५९)
१८९९ : पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ 'साने गुरूजी' – नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील सर्व विक्रम मोडणारे ठरले आहे. (मृत्यू: ११ जून १९५०)
१९२४ : मोहम्मद रफी – पार्श्वगायक, पद्मश्री (१९६७) (मृत्यू: ३१ जुलै १९८० मुंबई)
१९३० : देशातील प्रसिद्ध लेखिका उषा प्रियंवदा यांचा जन्म.
१९४२ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार इंद्र बानिया यांचा जन्म. १९५६: भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध अभिनेते अनिल कपूर यांचा जन्म.
१९५७ : हमीद करझाई – अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष
१९५९ : हिन्दी चित्रपट कलाकार अनिल कपूर यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू पियुष चावला यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२४ : वास्को द गामा – पोर्तुगीज दर्यावर्दी. अफ्रिकेला वळसा घालून युरोपातुन भारतात येण्याचा मार्ग त्याने शोधला.
१९६७ : बास्किन-रोबिन्स चे सहसंस्थापक बर्ट बास्कीन यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१३)
१९७३ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी – स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९७७ : नलिनीबाला देवी – आसामी कवयित्री व लेखिका (जन्म: २३ मार्च १८९८)
१९८७ : एम. जी. रामचंद्रन – अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (जन्म: १७ जानेवारी १९१७)
१९८८ : प्रसिद्ध लेखक जैनेंद्रकुमार यांचे निधन.
१९९३ : स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक पेरीयार ई. व्ही. रामस्वामी यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९९९ : नायकी इंक चे सहसंस्थापक बिल बोरमन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
२००० : कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक जॉन कूपर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२३)
२००५ : भानुमती रामकृष्ण – तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (जन्म: ७ सप्टेंबर १९२५).

## फळांच्या सालीपासून इंधन निर्मिती

फळ खाऊन झाल्यावर त्याची साल कचरा म्हणून फेकून देण्यात येते. मात्र या सालीपासून विश्वेश्वरय्या राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्थेच्या (व्हीएनआयटीत) केमिकल इंजिनिअरिंगच्या प्राध्यापकांनी 'बायोब्युटॅनॉल' तयार केले आहे. या 'बायोब्युटॅनॉल'चा उपयोग इंधनात 'इथेनॉल'ला पर्याय म्हणून केल्यावर होणारे प्रदूषण टाळता येणे शक्य होणार आहे.

साधारणतः गाडीच्या इंजिनमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा वापर होतो. त्यातून सल्फर डायऑक्साइड आणि ट्राय ऑक्साइड, याशिवाय नायट्रोजन डायऑक्साइड बाहेर पडते. त्यामुळे वातावरण प्रदूषित होते. ही बाब लक्षात घेऊन व्हीएनआयटीतील केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. कैलास वासेवार, डॉ. दिवाकर शेंडे, डॉ. कल्याणी मोटघरे यांच्या निर्देशनास आली.

त्यांनी कचऱ्यातून तयार होणारे 'बायोब्युटॅनॉल'चा वापर इंधनात करून त्यापासून वातावरणातील प्रदूषण कमी करण्यासाठी संशोधनास सुरू केली. या वेळी संशोधनातून 'बायोब्युटॅनॉल'चा इंधनात वापर केल्यास असे प्रदूषण निर्माण करणारे वायू बाहेर पडत नाहीत. विशेष म्हणजे सहज उपलब्ध होणारा फळांच्या सालीचा कचरा, एक शाश्वत आणि किफायतशीर पर्याय असून त्यामुळे ऊर्जा क्षेत्रासाठी फायदा होणार आहे. तसेच टाकाऊ पदार्थांपासून एक शाश्वत उत्पादन स्रोत निर्मिती होऊन शेतकरी आणि कृषी-उद्योगांसाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. काय आहे 'बायोब्युटॅनॉल' : 'बायोब्युटॅनॉल' एक जैवइंधन असून त्याच्या ऊर्जा कार्यक्षमतेसाठी आणि विद्यमान इंजिनासह सुसंगततेसाठी ओळखले जाते.

बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्यावासियांवर अन्याय करू नये

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातून प्रस्तावित असलेल्या लातूर अंबेजोगाई केज बीड जामखेड अहिल्यानगर कल्याण या लातूरकल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्याला डावलण्याचा प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. परिवहनमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सदर द्रुतगती मार्ग लातूर कळंब पाराईट खर्डा जामखेड अहिल्यानगर कल्याण या मार्गाने नेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर केल्याचे समोर आले आहे. हा प्रस्ताव बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासावर अन्याय करणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

या महामार्गामुळे बीड जिल्ह्यात उद्योगधंदे, रोजगारनिर्मिती तसेच कृषी व कृषीपूरक व्यवसायाला मोठा चालना मिळणार असून शेतकऱ्यांचे उत्पादन मुंबईठाणे महानगर प्रदेशापर्यंत जलदगतीने पोहोचू शकणार आहे. त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार असताना बीड जिल्ह्याला वगळण्याचा कोणताही निर्णय अन्यायकारक ठरेल, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. पूर्वनियोजित लातूरकल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात कोणताही बदल करू नये, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. जर नियोजित आराखड्यात बदल करण्यात आला, तर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणासाठी येणारे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या समोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात शेख युनूस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,माजी सैनिक अशोक येड (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, कुलदीप करपे, गणेश मस्के,प्रा.ज्ञानेश्वर राऊत, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजु गायके, अर्जुन सोनावणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लातूर ते मुंबई हे अंतर सध्याच्या सुमारे १०१२ तासांवरून ४५ तासांत पूर्ण करण्याच्या उद्देशाने लातूरकल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर करण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार हा मार्ग लातूर अंबेजोगाई केज बीड जामखेड अहिल्यानगर कल्याण असा प्रस्तावित आहे. मात्र, प्रताप सरनाईक यांनी अंतर ६० ते ७० किलोमीटरने कमी होईल, खर्च व वेळेची बचत होईल आणि धाराशिव जिल्ह्यालाही लाभ होईल, असे कारण देत पर्यायी मार्ग सुचविला आहे. परंतु यामुळे बीड जिल्ह्यातील कृषीप्रधान शेतकरी व व्यावसायिकांना होणारा विकासाचा लाभ हिरावला जाणार असल्याने सदर प्रस्तावाला तीव्र विरोध करण्यात येत आहे.

# श्रीगोंदा पंचायत समितीतील महिला बचत गट अपहार प्रकरणी अखेर गुन्हा दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

श्रीगोंदा पंचायत समिती अंतर्गत महिला बचत गटांच्या माध्यमातून शासकीय निधीचे नियमबाह्य वितरण, आर्थिक अनियमितता व मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, चौकशीदरम्यान आढळून आलेली अपहारित रक्कम अंतिम करण्यात आली आहे. या प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधितांविरोधात बेलवंडी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. श्रीगोंदा पंचायत समितीच्या अखत्यारित महिला बचत गटांच्या नावाने मंजूर झालेला शासकीय निधी काही खाजगी एंटरप्रायझेसच्या नावाने बँक खात्यांमध्ये वळवून लाखो रुपयांचा अपहार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात पंचायत समिती श्रीगोंदा कार्यालयातील काही जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचा थेट सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

या गंभीर आर्थिक गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासकीय रकमेचा अपहार केल्याबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करून तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली होती. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी या प्रकरणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी १० डिसेंबरपासून विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत प्रशासनाने अखेर हालचाली सुरू केल्या. चौकशी पूर्ण करून अपहारित रक्कम निश्चित करण्यात आली असून, संबंधित दोषींविरोधात बेलवंडी पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती लेखी पत्राद्वारे श्रीगोंदा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी कळविली आहे. या कारवाईमुळे पंचायत समितीतील भ्रष्टाचार प्रकरणी प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून, भविष्यात दोषींवर आणखी कडक शासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनी सादर केले १०० विज्ञानाचे प्रयोग

## सोयगाव येथील अजंता स्कूल येथे विज्ञान प्रदर्शन

सोयगाव

अजंता व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये सोमवारी विज्ञान प्रदर्शन आणि स्टुडंट्स लेड कॉन्फरन्स झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुशील जावळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रघुनाथ फुसे, संजय शहापूरकर, संजय पाटील, सुनील शेटे, भास्कर पिंगळकर, डॉ. दिनकर पिंगळकर, डॉ. स्वाती पिंगळकर आणि मुख्याध्यापिका मीनाक्षी रोकडे उपस्थित होत्या.

प्रास्ताविक शाळेच्या संचालिका डॉ. स्वाती पिंगळकर यांनी केले. सूत्रसंचालन सोनाली बागुल यांनी केले. आभार प्रदर्शन पूजा दामोधर यांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो. पुस्तकांव्यतिरिक्त ज्ञान मिळते. अभ्यासात रुची वाढते. आत्मविश्वास वाढतो, असे डॉ. स्वाती पिंगळकर यांनी सांगितले. प्रा. सुशील जावळे यांनी विज्ञानातील शोधांचे चांगले आणि वाईट परिणाम समजावून सांगितले. नर्सरी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी चांद्रयान, बुलडोझर, भूकंप सूचक यंत्र, एटीएम मशीन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वॉटर प्युरिफायर यासह १०० प्रयोग सादर केले. पाहुणे आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका प्रियांका रोकडे, सीमा भामरे, सोनाली बागुल, दीक्षा पवार, पूजा दामोधर, रुपाली गोल्हरे, शीतल कटोले आणि शिक्षक रामचंद्र लाडकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला पालकांची मोठी उपस्थिती होती.


# सोलार पंपच्या स्ट्रक्चरची फिटिंग करणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई करा -जाधव

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सराकारने शेतकऱ्यांना सोलार कृषी पंप अनुदान योजनेअंतर्गत ९०% आणि ९५% अनुदान तत्वावर कृषी पंप देण्यात येत आहेत. याचेच सोलर फिटिंग करण्याचे काम जोरात चालू आहे परंतु हा सोलार ज्यावेळेस बसविण्यात येत आहे त्यावेळेस मात्र गुत्तेदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाची व दर्जाहीन फिटिंग केली जाते. अनेक फिटिंग केलेले स्ट्रक्चर पॅनल सध्या वाऱ्याने उडून जातील अशा अवस्थेत दिसत आहेत. त्यामुळे अशा गुत्तेदारावर शेतकऱ्यांची फसवणूक केली या गुन्ह्या अंतर्गत गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी दिनकर जाधव यांनी केली आहे. सरकारने शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी 'पीएम कुसुम' आणि 'मुख्यमंत्री सौर कृषी पंप' यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजना आणल्या. मात्र, या योजनेचे कंत्राट घेतलेल्या एजन्सी आणि स्थानिक ठेकेदारांकडून शेतकऱ्यांची उघडपणे पिळवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. शासन निर्णयानुसार सौर पंप बसवण्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीची असताना शेतकऱ्यांना खड्डे खोदण्यापासून ते वाळू-सिमेंट आणण्यापर्यंतचा नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे.

महाराष्ट्रात सोलार कृषी पंप मोठ्या प्रमाणात बसवले जात आहेत. हे सरकारच्या आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. परंतु हे सौर पंप ज्यावेळी बसवताना सोलार प्लेटची फिटींग केली जाते त्यावेळी मात्र गुत्तेदारांकडून शेतकऱ्यांना लुटले जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या प्रकाराला आळा घालण्यासाठी शासकीय स्तरावर एखादा अधिकारी नेमणूक करणे गरजेचे आहे. कारण ज्यावेळी सौर कृषी पंप शेतकऱ्यांच्या शेतात फिट करण्यास वेळ येते त्यावेळेस मात्र शेतकऱ्याकडूनच तो खड्डा खोदून घेतला जातो व फिटिंग साठी लागणारे साहित्य हे शेतकऱ्यांना जमा करण्यास गुत्तेदार सांगतात. जे की हा सर्व खर्च गुत्तेदार यांनी करणे गरजेचे अथवा नियमात आहे. परंतु हे गुत्तेदार शेतकऱ्यांना वेटीस धरत आहेत व ज्यावेळी हा सोलार पॅनल फिटिंग बसवण्यात येतो त्यावेळी सुद्धा त्याची फिटिंग व्यवस्थित केले जात नाही. त्यामुळे थोड्या फार वादळात आणि वाऱ्यामध्ये हे सोलार पनल अगदी सहज उपटले जाऊ शकतात. त्यामुळे शेतकर्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची तक्रार असेल अशा शेतकर्यांनी या गुत्तदाराविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाही करता येऊ शकते. कारण या गुत्तेदारांना वारंवार कल्पना देऊनही ते आरेरावीची आणि उडवाउडवीची उत्तरे देतात. तसेच या गुत्तेदारांना काळ्या यादीत समावेश करण्यात यावा. शेतकऱ्यांचे रक्त पिणाऱ्या अशा गुत्तेदारावर गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे केज तालुका अध्यक्ष तथा शेतकरी दिनकर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. सौर पॅनेलचे खांब उभे करण्यासाठीचे सिव्हिल वर्क आणि फाऊंडेशन करण्याची जबाबदारी पूर्णपणे कंत्राटदार कंपनीची आहे. २. यासाठी लागणारे सिमेंट, वाळू, पाणी आणि मजूर कंपनीने स्वतः उपलब्ध करायचे आहेत. ३. शेतकऱ्यावर केवळ जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आहे.

# दिया छाजेड, इशिका अडसूळ यांचे शरद पवार यांच्याकडून कौतुक



अहिल्यानगर । प्रतिनिधी

उत्तर युरोपातील एस्टोनियात ७० देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागे टाकत जगात प्रथम क्रमांक पटकविला. याबद्दल माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दिया छाजेड व इशिका अडसूळ यांच्या जागतिक विक्रमाबद्दल कौतुकाची थाप दिली.

उत्तर युरोप खंडातील एस्टोनिया देशात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत यावर्षी अहिल्यानगरच्या दिया प्रीतम छाजेड व इशिका अभिजीत अडसूळ या दोन भारतीय विद्यार्थिनींनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. जगातील ७० प्रगत देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोघींनीही सर्व फेऱ्या यशस्वीरीत्या पार करत प्रथम क्रमांक पटकावून जगात 'नंबर वन' होण्याचा मान मिळवला आहे. याबद्दल मला अभिमान वाटतो असे श्री. पवार म्हणाले. श्री.पवार यांनी केलेल्या कौतुकाने आम्ही भारावून गेलो असे दिया व ईशा यांनी सांगितले. नगर फोटो मजकूर - जागतिक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून भारताचा तिरंगा उंचविला याबद्दल दिया छाजेड व इशिका अडसूळ यांचा गौरव माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी केला.

**टीसी हरवला आहे**

सुमित संतोष देसाई या नावाने असलेला इ.१२. वी पासचा ओरिजनल टीसी कडा-धानोरा प्रवासात हरवला आहे. सापडल्यास

संपर्क:-
मो.नं.८५५२८६२१६१

# महाबळेश्वरच्या तुलनेत नगरचा पारा ५ अंश घसरला

## शहरावर पहाटे ५ ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत दाट धुक्याची चादर

अहिल्यानगर। प्रतिनिधी

सोमवारी महाबळेश्वरपेक्षाही अहिल्यानगर हे थंड शहर ठरले. २२ डिसेंबरला महाबळेश्वरचे किमान तापमान १२.१ अंश सेल्सिअस होते. तर शहराचे किमान तापमान ७.३ अंशावर नोंदवले गेले. मंगळवारपासून किमान तापमान पुन्हा घसरुन ते ६ अंशावर जाणार असून, मंगळवारी शहरावर पहाटे ५ वाजल्यापासून ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत दाट धुक्याची चादर पसरणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

डिसेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात सलग ३ वेळा शहराचे किमान तापमान ६ अंशावर गेले होते. त्यानंतर किमान तापमानात चढ-उतार होत होता. गेल्या ७ दिवसांपासून मात्र शहराचे किमान तापमान ७ ते ८ अंशावर होते. शनिवार (२० डिसेंबर) मात्र किमान तापमान पुन्हा ६.४ अंशावर गेले आहे. त्यामुळे थंडीत वाढ झाली होती. रविवार (२१ डिसेंबर) ला किमान तापमान ६.५ होते. तर सोमवार (२२ डिसेंबर) ला किमान तापमान ७.३ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. दहा वर्षांपूर्वी ( नोव्हेंबर २०१६) मध्ये शहराचे किमान तापमान ६ अंशावर गेले होते. यंदा १७ व १८ नोव्हेंबरला किमान तापमान ८ अंशावर गेले. त्यामुळे थंडीचा कडाका वाढला होता. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या दिवशीच शहराचे किमान तापमान ९ अंशावर गेले होते. त्यानंतर किमान तापमानातील घसरण कायम होती. मंगळवार (९ डिसेंबर) ला किमान तापमान ७ अंशावर गेले होते. बुधवारी (१० डिसेंबर) ला यामध्ये १ अंशांनी घट होऊन ते ६ अंशावर गेले आहे. त्यानंतर बुधवार (११ डिसेंबर) व गुरुवार (१२ डिसेंबर) ला या दोन दिवशी सलग ६ अंशावर किमान तापमान होते. कडाक्याच्या थंडीत फिरायला आलेले नागरिक. छाया : सिद्धार्थ दीक्षित. बी.एन.शिंदे, हवामान तज्ज्ञ, अहिल्यानगर पुढचे ५ दिवस थंडी कायम राहिल २३ डिसेंबरला शहराचे किमान तापमान ६ अंशावर जाण्याची शक्यता आहे. २४ ते २८ डिसेंबरला शहराचे किमान तापमान ७ ते १० अंशावर राहिल. तर शहराचे कमाल तापमान २८ ते २९ अंशावर राहणार आहे. रात्री थंडी व सकाळी ९ वाजल्यानंतर कडक उन्हाचे चटके जाणवणार आहेत. पुढच्या ५ दिवसांत सायंकाळी ५.३० वाजल्यापासून थंडी जाणवणार आहे. २१ डिसेंबरचा दिवस सर्वात लहान व रात्र सर्वात मोठी होती. साधारण अहिल्यानगर जिल्ह्यात २१ डिसेंबरचा दिवस सव्वा तेरा तासांचा होता.

# महिलेला रुग्णालयात नेत असताना अपघात; ३ ठार, २ गंभीर

परभणी। प्रतिनिधी

छातीत दुखत असल्याने आरळ येथून स्विफ्ट डिझायर कारने महिलेला परभणीला रुग्णालयात नेत असताना वसमत रोडवरील राहटी पाटीजवळ या कारला भरधाव क्रेटा कारने समोरून जोराची धडक दिली. यात तीन ठार, तर दोन जण गंभीर जखमी झाले. हा अपघात परभणी शहरापासून १० किलोमीटर अंतरावर वसमत रस्त्यावरील राहटी परिसरातील विश्वशांती ज्ञानपीठसमोर शनिवारी पहाटेच्या सुमारास झाला. जखमींवर परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध ताडकळस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी सखाराम सटवाजी साखरे यांचे चुलत भाऊ बाबाराव दत्तराव साखरे यांच्याकडे स्विफ्ट डिझायर कार (एमएच ३८ एडी ३५४१)आहे. त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या कांताबाई कातोरे यांच्याकडे त्यांच्या पिंगळी येथील नणंद विमलबाई जाधव या भेटण्यासाठी रात्री १०:३० वाजता आरळ येथे आल्या होत्या. त्यांच्या अचानक छातीत दुखत असल्याने त्यांना स्विफ्ट डिझायर कारमध्ये आरळ येथून परभणीच्या दिशेने रुग्णालयात नेत असताना परभणीकडून वसमतकडे जात असलेली क्रेटा कारच्या अपघातात कारचा अक्षरशः चुराडा झाला. घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिसांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन मोरे, रणखांब यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी सखाराम सटवाजी साखरे (रा. आरळ, ता. वसमत) यांच्या फिर्यादीवरून क्रेटा कारच्या (एमएच २२ बीसी७८८८) चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# झेडपी, महापालिकेसाठी विखे पाटलांचा करिष्मा पुन्हा झाला अधोरेखित

## जिल्हा परिषदेसह महापालिकेचे मैदान मारण्यासाठी निर्माण झाले अनुकूल वातावरण

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नगर परिषद निवडणुकीत भाजपाकडे सात आणि शिंदे शिवसेनेकडे दोन नगर परिषदा गेल्या. म्हणजेच ९ परिषदा महायुतीच्या ताब्यात आल्या. नेवासा आणि शेवगावमध्ये शिंदे गटाचा नगराध्यक्ष होण्यात विखे पाटलांची रसद महत्वपूर्ण ठरली. भाजपाकडील सात नगरपरिषदांचा विचार करता कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, शिर्डी, राहाता याच नगरपरिषदांमध्ये विखे फॅक्टर निर्णायक ठरला. जामखेडमध्ये सभापती राम शिंदे यांचे तर श्रीगोंद्यात आ. विक्रम पाचपुते यांचे मायक्रोप्लॅनिंग कामी आले. काँग्रेसने श्रीरामपूरमध्ये विजयश्री खेचून आणली. राहुरी आणि संगमनेरमध्ये स्थानिक आघाडीच्या माध्यमातून अनुक्रमे प्राजक्त तनपुरे आणि सत्यजित तांबे यांनी भाजपाला सत्तेपासून दूर ठेवले. नगरपरिषदेचा हा निकाल येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपासमर्थकांना दिलासा देणारा ठरला असून त्यांचा उत्साह देखील वाढविणारा असणार!

कोपरगावात भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी राष्ट्रवादीचे आ. आशुतोष काळे यांना पराभवाचा धक्का देत नगराध्यक्ष पदासह १९ नगरसेवक निवडून आणले. मात्र, येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेला शब्द पाळल्याचेच निकालातून स्पष्टपणे समोर आले.

राष्ट्रवादीच्या खालोखाल शिवसेना ठाकरे गटाचे वर्चस्व राहिलेल्या या जिल्ह्यात उद्धव ठाकरे गटाचा पुरता सुपडासाफ झाल्याचे स्पष्टपणे समोर आले. ठाकरे गटाच्या ताब्यात एकही परिषद आली नाही. मशाल चिन्हावर लढलेला एकही उमेदवार विजयी झाला नाही. पक्षाचे उपनेतेपद सांभाळणाऱ्या साजन पाचपुते यांच्यासह अनेकांनी फंदफितुरी केली आणि त्यामुळे सेनेचा सुपडासाफ झाला. अत्यंत चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या संगमनेर नगरपरिषदेत माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर सेवा समितीने महायुतीला पराभूत करत एकहाती सत्ता मिळविली. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.मैथिली तांबे यांनी शिवसेनेच्या सुवर्णा खताळ यांचा १६ हजार ४०८ मतांनी दणदणीत पराभव करत विजय मिळविला. या निवडणुकीत आ. अमोल खताळ यांच्या शिवसेनेला अवघी एक जागा मिळाली. खरेतर या निवडणुकीत आ. खताळ यांचा पराभव मानला जात नसून विखे पाटलांचाच पराभव मानला जात आहे. आ. सत्यजित तांबे ही निवडणूक 'सत्यजित स्टाईल'ने फक्त जिंकलीच नाही तर आगामी निवडणुकीत आपली रणनीती काय असेल हेच त्यांनी दाखवून दिले. श्रीगोंद्यात विधानसभा निवडणुकीप्रमाणे नगरपरिषदेतही चौरंगी लढत कशी होईल याची पुरेपुर काळजी आ. विक्रम पाचपुते यांनी घेतली. बाबासाहेब भोस यांनी सुपारी घेतली होते हे त्यांना मिळालेल्या मतांवरुन स्पष्ट झाले. अजित पवार गटाचे सात नेते असतानाही त्यांना तिसऱ्या क्रमांकावर जावे लागले. या निवडणुकीत शिंदे सेनेच्या मनोहर पाटे यांचा पराभव झाला असला तरी ते आता तालुक्याचे नेते म्हणून पुढे येणार हे स्पष्ट आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत पाचपुते आणि अजित पवार गटाच्या नेत्यांमध्ये होणाऱ्या सेटींगमध्ये पोटे यांचा मोठा अडसर येणार हेही स्पष्ट आहे. भाजपने सर्वाधिक सात नगराध्यक्ष पदासह १२७ नगरसेवक निवडून आणल्याने भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे अहिल्यानगर महापालिकेत या विजयाचा फायदा त्यांना होणार आहे. भाजपकडे सर्वाधिक इच्छुक असल्याने व महायुतीत भाजप हा मोठा भाऊ असल्याचे निकालावरून सिद्ध झाल्याने जागावाटपाचा जास्तीत-जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जागावाटपात गणित बिघडल्यास भाजप स्वबळावर महापालिकेची निवडणूक लढवू शकतो. जामखेमध्ये सभापती राम शिंदे यांनी आमदार रोहित पवार यांना धोबीपछाड देत नगराध्यक्ष पदासह १५ जागा मिळवत सत्ता खेचून आणली. आ. पवार यांना हा मोठा धक्का आहे. राज्य आणि देशपातळीवरच्या प्रश्नावर कायम प्रसिद्धीच्या मागे लागत असणाऱ्या आ. पवार यांची पकड संपुष्टात आली असल्याचेच यातून स्पष्ट झाले. प्रा. राम शिंदे यांनी विधानसभेच्या पराभवाचे थेट उट्टे काढल्याचेच सिद्ध झाले. जिल्ह्यातील एकही नगरपरिषद अजित पवार गटाच्या ताब्यात आली नाही. अजित पवार गटाने जिल्ह्यातील एकूण १४० जागांवर उमेदवार दिले होते. त्यातील फक्त २४ उमेदवार विजयी झाले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खा. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील भाजपने सर्वाधिक सात नगराध्यक्ष व नगरसेवक पदे जिंकून जिल्ह्यात भाजपची हवा असल्याचे पुन्हा एकदा दाखवून देत विरोधकांना धोबीपछाड दिला आहे. २३४ जागांवर भाजपाने उमेदवार दिले होते. त्यातील १२७ जागांवर भाजपा विजयी झाली. शरद पवार यांच्या समर्थकांचा बालेकिल्ला अशी कधीकाळी ओळख असणाऱ्या या जिल्ह्यातील एकाही नगरपरिषदेवर शरद पवार गटाची सत्ता आली नाही. ७५ पैकी अवघे १४ नगरसेवक निवडून आले. या विजयी उमेदवारांच्या विजयात त्यांचा स्वत:चा व्यक्तीगत संपर्क जास्त कारणीभूत ठरला.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६३७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २७/१०/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुनिल अशोक सांगळे सर्व्हे नं.-१३ सहन प्लॉट नं. ६९ सिटी सर्व्हे नं. १९४२ नं.प.मि.नं.१८-१२८-६९ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१२८-६९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. ७७ व ७८ चा भाग
पश्चिम : ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- प्लॉट नं. ७०
उत्तर- प्लॉट नं. ६८

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

# घड्याळाला मुस्लिम मतदारांनी तारले

## आ.क्षीरसागर यांना अति आत्मविश्वास नडला; तर डॉ. योगेश पारंपारिक मतदारांच्या भरवशावर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपालिका निवडणुकीनंतर सर्वात मोठा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस( शरदचंद्र पवार गट) हा पुढे येईल आणि याच पक्षाचा नगराध्यक्ष होईल हा विश्वास मुस्लिम मतदारांनी खोडून काढला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाच्या श्रीमती हेमलता पारवे यांना भरघोस मतदान करून नगरपालिकेला नवीन चेहरा दिला. या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मधून ऐनवेळी भाजपात गेलेले डॉ. योगेश क्षीरसागर यांची भिस्त मात्र भाजपाचे पारंपारिक मतदार यांच्यावर होती. त्यांनी डॉ. योगेश क्षीरसागर यांचा विश्वास सार्थ ठरवला. मात्र ऐनवेळी मुस्लिम मतदारांनी तुतारीला डावलल्याने शेवटी विजय हा अजितदादा गटाचा झाला. त्यांचे नगरसेवक मोठ्या प्रमाणात निवडून आले.**



बीड नगरपालिकेसाठी अत्यंत अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीमध्ये सुरुवातीपासूनच आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवारांना झुकते माप मिळेल अशी परिस्थिती होती. लोकातला आणि अनेक वर्षाचा अनुभव असलेला उमेदवार म्हणून सौ. स्मिता वाघमारे यांना प्रथम पसंती मिळेल असे वाटत असतानाच या निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाला. सुरुवातीला दलित मतदारांनी आणि शहरातील दलित नेत्यांनी सौ.स्मिता वाघमारे यांना मतदान करण्याचा विडा उचलला. जाहीर सभा घेऊन शहरातील नेत्यांनी आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सौ.स्मिता वाघमारे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा दावा केला. मात्र प्रत्यक्षात प्रचार करताना ही यंत्रणा तेवढी सक्षम राहिली नाही. या यंत्रणेतील नेते लोकांपर्यंत पोहोचू शकले नाहीत. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात दलित मतेही घड्याळाच्या बाजूला तर काही कमळाच्या बाजूला गेली. प्रथम क्रमांकावर असलेला हा उमेदवार शेवटी तिसऱ्या क्रमांकावर गेला. ज्यावेळी दलित नेत्यांनी सर्व दलित समाज एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी







### दलित ऐक्याचे काय झाले?

नगराध्यक्ष उमेदवारी निवडीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर गेल्या अनेक वर्षापासून नगरपालिकेमध्ये नगरसेवक असलेले आणि काही काळ सभापती राहिलेले विष्णू वाघमारे यांच्या पत्नी सौ स्मिता वाघमारे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने उमेदवारी देण्याचे स्पष्ट केल्यानंतर शहरातील दलित नेते विशेषता युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शहरामध्ये जाहीर सभा घेऊन सौ स्मिता वाघमारे यांना जाहीर पाठिंबा दिला. आणि शहरातील सर्व दलित समाज त्यांच्या पाठीशी उभे उभे राहील अशी घोषणा केली. मात्र ज्यावेळी प्रचार यंत्रणा सुरू झाली. प्रत्यक्ष प्रचार प्रक्रिया सुरू झाली. त्यावेळी हे नेते कुठेच दिसले नाहीत. त्यांनी प्रत्यक्ष मतदारापर्यंत पोहोचून मतदारांना आश्वासित करणे गरजेचे होते. मात्र ते झालेच नाही. त्यामुळे अनेक दलित मतदार घड्याळाच्या बाजूने गेले.

शहरातील सर्व मुस्लिमांचे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. जर दलित समाज स्मिता वाघमारे यांच्या पाठीशी उभा राहत असेल तर बीड शहरातील दैनिक सिटीजनचे संपादक शेख मुजीब यांच्या सासुबाई असलेल्या हेमलता पारवे यांच्या पाठीशी आपण का उभे राहू नये? असी चर्चा शहरात सुरू झाली. आणि याचे कॅम्पेनिंग करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेख मुजीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना यश आले. त्यामुळे मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात घड्याळाच्या पाठीशी उभा राहिला.

निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला सोडून ऐनवेळी भाजपा मध्ये आलेले डॉ. योगेश क्षीरसागर यांची भिस्त मात्र त्यांचे काही जुने सहकारी यांच्याबरोबरच भाजपाला



मतदान करणारे पारंपारिक मतदार यांच्यावर होती. गेल्या अनेक वर्षापासून भाजपाला मानणारे अनेक मतदार क्षीरसागर यांच्या पाठीशी उभे राहायचे. हा मतदार आता कमळ चिन्ह असल्याने पूर्णपणे आपल्या पाठीशी उभा राहील असा विश्वास डॉ. योगेश शिरसागर यांना होता. आणि तो सार्थही होता. भाजपाला मानणारा बीड शहरातील मतदार पूर्णपणे कमळ चिन्हावर नगराध्यक्ष पदासाठी उभा असलेल्या डॉ.ज्योती घुबरे यांच्या पाठीशी उभा राहिला. मात्र हा मतदार डॉ.घुबरे यांना विजयी करण्यास पुरेसा ठरला नाही. आ. संदीप क्षीरसागर यांना मुस्लिम मतांमध्ये विभाजन होऊन विधानसभेप्रमाणे तुतारीला मतदान करेल असा अति आत्मविश्वास नडला.

मुस्लिम मतदार हा पूर्णपणे घड्याळाच्या बाजूने गेल्याने तुतारी एक नंबर वर असलेले तुतारीचे उमेदवार तीन नंबरला गेले. सुरुवातीच्या काही फेऱ्यामध्ये भाजपाचे उमेदवार सौ घुबरे या मोठ्या लीडने पुढे होत्या. त्यांच्या पाठोपाठ तुतारीच्या उमेदवार होत्या. मात्र जसजसे मुस्लिम बहुल प्रभागातील मतमोजणी सुरू झाली. त्यावेळी मात्र डॉ. घुबरे यांची लीड मोठ्या प्रमाणात कमी झाली. आणि शेवटी ती दोन नंबरला आली. मुस्लिम बहुल वार्डामध्ये मतमोजणी सुरू झाल्यानंतर घड्याळाच्या उमेदवार श्रीमती पारवे या एक नंबरला आल्या. आणि तुतारीच्या सौ. वाघमारे या तीन नंबरला गेल्या. मुस्लिम वार्डातील मतमोजणी सुरू झाल्यानंतर श्रीमती पारवे यांची आघाडी वाढत गेली. आणि त्या शेवटी ३३ हजार मतावर थांबल्या. मतमोजणी झाल्यानंतर घड्याळाचा उमेदवार विजयी झाला. हा निकाल बीड शहरातील नागरिकांसाठी अनापेक्षित होता. मात्र केवळ मुस्लिम मतदारांच्या पाठिंबावरच हा उमेदवार विजय होऊ शकला. हे नाकारता येत नाही. इतर भागांमध्येही राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाला मतदान मिळाले. मात्र ते पुरेसे नव्हते. मुस्लिम बहुल वार्डामध्ये या मताची पूर्तता झाली. केवळ मुस्लिम मतदारांच्या पाठिंबावरच हा उमेदवार विजयी झाल्याचे स्पष्ट झाले.

## डॉ.ज्योती घुंबरे यांच्याकडून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

### निवडणूक लढविण्याची संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांचे मानले आभार



बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्या निवासस्थानी मंगळवारी (दि.२३) सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक मंगेश धोंगडे तसेच ॲड.नागेश तांबरे यांचा सन्मान केला. इतरही नगरसेवकांचा सत्कार केला जाणार असल्याचे सांगत डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या, पक्षाने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांचे विशेष आभार मानले. आगामी काळात ◀◀ पान ३ वर

## शाळा आता मनमानी पद्धतीने इंटरनॅशनल, ग्लोबल शब्द वापरू शकणार नाहीत

### शासनाचा निर्णय; निर्णयाची अंमलबजावणी करा –मनोज जाधव यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

राज्य शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शाळांकडून आपल्या नावांमध्ये ग्लोबल, इंटरनॅशनल, सीबीएसई अशा फॅन्सी शब्दांचा वापर करून पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत शिक्षण संचालनालयाने आता कठोर पाऊल उचलले आहेत. पालक–विद्यार्थ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी अशा शब्दांचा वापर करणाऱ्या शाळांवर बंदी घालण्यात आली असून, त्यांना तात्काळ नावे बदलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याची जिल्ह्यात तात्काळ काटेकोरपणे अंमलबजावणी करून पालकांची दिशाभूल करणाऱ्या शाळांची नावे बदलण्यात यावीत अशी मागणी आज निवेदनाद्वारे शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.



राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या अनेक शाळांनी आपल्या नावांमध्ये इंटरनॅशनल, ग्लोबल, सीबीएसई किंवा इंग्लिश मीडियम यांसारख्या शब्दांचा गैरवापर सुरू केला आहे. या शब्दांमुळे संबंधित शाळा आंतरराष्ट्रीय किंवा केंद्रीय शिक्षण मंडळाशी (उदा. ) संलग्न असल्याचा पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा गैरसमज होत आहे, ज्यामुळे त्यांची दिशाभूल होत आहे. अनेक शाळांकडे कोणतीही आंतरराष्ट्रीय संलग्नता नसतानाही ते असे शब्द वापरत असल्याचे सर्रास पाहावयास मिळत आहे. पालक, विद्यार्थी आणि समाजाची दिशाभूल किंवा फसवणूक करणारे गैर–कायदेशीर शब्द शाळांच्या नावांमध्ये वापरले जाऊ नयेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सीबीएसई () हे केंद्र सरकारने स्थापन केलेल्या परीक्षा मंडळाचे नाव आहे. राज्य मंडळाच्या शाळांनी हे नाव वापरणे कायदेशीरदृष्ट्या अनुचित आहे. तसेच, इंटरनॅशनल किंवा ग्लोबल शब्द वापरण्यासाठी परदेशातील शाखा किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय संलग्नता असणे बंधनकारक आहे. तेव्हा बीड जिल्ह्यातील चुकीच्या नावाने सुरू ◀◀ पान ३ वर

## सापडलेले १५ मोबाईल पोलिसांनी केले नागरिकांना सुपूर्त

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस स्टेशन गेवराई पोलीस दलाने चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल शोधून काढून ते मूळ मालकांकडे सुपूर्द करत नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. या कारवाईत एकूण १५ मोबाईल फोन नागरिकांना परत देण्यात आले आहेत.**



सदरील उपक्रमाची संकल्पना व प्रेरणा बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनानुसार हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.या संपूर्ण कामगिरीसाठी अप्पर पोलीस अधीक्षक ,सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके व पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.या मोहिमेत पोलीस उप निरीक्षक श्रीमती. निशिगंधा खुळे, पोलीस हवालदार गणेश घोलप व पोलीस अंमलदार ऋषिकेश पोटे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन विशेष परिश्रम घेतले. सखोल तपास, तांत्रिक विश्लेषण व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सदरील कामगिरी होऊ शकली.शोधून काढलेले मोबाईल पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना परत देण्यात आले. या कामगिरीमुळे नागरिकांचा पोलीस दलावरील विश्वास अधिक दृढ झाला असून, बीड पोलीस दल सदैव नागरिकांच्या सेवेत तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## फुलसांगवीतील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वाटप तीन दिवसात ७० ब्रास वाळूचा लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील फुलसांगवी गावच्या ८६ घरकुल लाभार्थ्यांना मार्कडवाडी शिवरातील सिंदफना नदीच्या पात्रतावून मोफत वाळूची वाटप सुरु असून याचा लाभ घ्यावा असे अवाहन मंडळाधिकारी निशांत ठाकूर व तलाठी राहुल गोरडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.




शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी तलाठी सज्जा, ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल योजनेतील सुमारे ८६ लाभार्थ्यांची यादी पंचायत समिती कडून जाहीर करण्यात आली आहे. या यादीनुसार लाभार्थ्यांना मोफत प्रत्येकी पाच ब्रास वाळूची वाटप करण्याची जबाबदारी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी मंडळाधिकारी निशांत ठाकूर व तलाठी राहुल गोरडे यांच्याकडे सोपवली आहे. या प्रमाणे गेल्या तीन दिवसापासून मार्कडवाडी शिवारातील सिंदफणा नदीच्या पात्रातून घरकुल लाभार्थ्यांना ◀◀ पान ३ वर

## अजितदादा बीडमध्ये वाटप झालेली निकृष्ठ दर्जाची ज्वारी आपण बारामतीत वाटप करा – ललित अब्बड



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून सध्या अत्यंत निकृष्ट दर्जाची ज्वारी वाटप करण्यात येत असून, त्यामुळे गोरगरीब लाभार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ही ज्वारी इतक्या वाईट प्रतीची आहे की माणसं तर दूरच, जनावरेही ती खाण्यास तयार नाहीत, असा संतप्त आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, हीच निकृष्ट ज्वारी स्वस्त धान्य दुकानदारांना जबरदस्तीने वाटप करण्यास भाग पाडली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे जिल्हा

**निकृष्ट ज्वारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचीच चौकशी करावी संबंधित विभागाचे प्रमुख असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी हे या संपूर्ण प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते लल्लीत अब्बड यांनी केला आहे. ही परिस्थिती पाहता यामध्ये थेट भ्रष्टाचार झाला असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शिवकुमार स्वामी यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.**

पुरवठा अधिकारी यांनी इतक्या हलक्या दर्जाची ज्वारी खरेदी केलीच कशी ? ही ज्वारी कोणाकडून कोणत्या संस्थेकडून घेतली आहे ? त्या संस्थेची व पुरवठा विभाग अधिकाऱ्याची चौकशी करुन तसेच खरेदी केलेला माल कुठे ठेवण्यात आला आहे तो माल शिल्लक आहे किंवा नाही यामुळे पुरवठा विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

या संपूर्ण प्रकरणात जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या नेतृत्वाखाली वाटप केली जात आहे, असा सवाल ◀◀ पान ३ वर

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून मयताच्या वारसाला मिळाला दोन लाखाचा विमा

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील ग्रामीण बँकेचे खातेदार मोठेवाडी येथील मयत परमेश्वर रामभाऊ गरड यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांचे वारस आई छाया रामभाऊ गरड यांनी माहे नोव्हेंबर रोजी क्लेम दाखल केला. बँकचे व्यवस्थापक विकास भटकर यांनी वरिष्ठ स्तरावर योग्य ते पाठपुरावा योग्य त्या वेळात केल्यामुळे वारसांना एक महिन्यात बँकेकडून दोन लाख रूपायांचा विमा योजनेचा लाभ मिळवून दिला.



व्यवस्थापक विकास भटकर यांनी कमी कालावधीत मयताच्या वारसास लाभ मिळवून दिल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. वार्षिक ४३६ रूपये पंतप्रधान जिवन ज्योती योजने अंतर्गत वारस छाया रामभाऊ गरड यांना लाभ झाला आहे.

बँकेकडून दोन लाख रूपायाचा विमा वारसास शाखा व्यवस्थापक विकास भटकर, नवनाथ वाघमोडे, विशाल साळवे,सिद्धेश्वर जाधव, राहुल कुलकर्णी गावातील सुदर्शन हिवरकर यांच्या उपस्थित विमा वारस छाया रामभाऊ गरड यांना दि.२३ डिसेंबर मंगळवार रोजी प्रदान करण्यात आला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ । पान ७

# सावलीच्या छायेतून लोकशाहीकडे वाटचाल!

## निराधारांनी घेतली मतदानाची शपथ; १५ जानेवारी रोजी मतदानाचा ठाम निर्धार

**पिंपरी । प्रतिनिधी**

कोणाची आयुष्याच्या प्रवासात नाती दूरावली, तर कोणी परिस्थितीच्या ओघात एकाकी पडलेला कोणाच्या नात्यांची ऊब हरवलेली, तर कोणाचा ओळखींचा आधार तुटलेला... समाजातील अशा निराधारांना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने रिअल लाईफ रिअल पीपल या संस्थेच्या सहकार्याने चालवण्यात येणाऱ्या सावली निवारा केंद्रामध्ये मायेच्या छायेखाली पुन्हा जगण्याची उमेद फुलू लागली आहे. येथे निवारा मिळतोच; पण त्याहून अधिक मिळते ते माणूस म्हणून स्वीकारले जाण्याचं समाधान. याच सावलीत आज या निराधारांनी येत्या १५ जानेवारी २०२५ रोजी पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्याचा ठाम निर्धार केला आहे. यासर्वांनी आज मतदानाची शपथ देखील घेतली. यावेळी आपलं मत म्हणजे केवळ अधिकार नाही, तर समाजाशी पुन्हा जोडले जाण्याची ओळख आहे, ही जाणीव त्यांच्या चेहऱ्यावर दिसली.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली महापालिका हद्दीत स्वीप अंतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आज सावली निवारा केंद्रामध्ये मतदानाची शपथ व मतदान जनजागृती पथनाट्य सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, रिअल लाईफ रिअल पीपल संस्थेचे अध्यक्ष एम. ए. हुसैन, सावली केंद्रातील व्यवस्थापक गौतम थोरात, सहव्यवस्थापक सचिन बोधनकर, समाजसेवक विष्णू गायकवाड, शाहनवाज हुसैन, अग्नेस फ्रान्सीस, काळजीवाहक अमोल भाट, राजाबाई शेळके, लक्ष्मी वायकर, उमा भंडारी, लक्ष्मी कांबळे यांच्यासह केंद्रातील लाभार्थी उपस्थित होते.





मतदान जनजागृतीबाबत पथनाट्याचे सादरीकरण करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, 'मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा आहे. समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत हा अधिकार आणि त्याचे महत्त्व पोहोचवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सावलीसारख्या निवारा केंद्रांमधून लोकशाहीचा संदेश देणं हे अत्यंत संवेदनशील आणि प्रेरणादायी कार्य आहे. निराधार असूनदेखील तुम्ही मतदानासाठी पुढाकार घेऊन समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण कराल, अशी खात्री आहे. तुमचे मत अमूल्य असून १५ जानेवारी रोजी नक्की मतदान करा व लोकशाही बळकटीकरणासाठी हातभार लावा,' असे देखील त्यांनी सांगितले. उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले की, 'सावली निवारा केंद्रातून निराधारांना केवळ निवारा देणेच नव्हे, तर त्यांना नागरिक म्हणून त्यांचे हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करून देणं हे समाजासाठी महत्त्वाचं पाऊल आहे. सावली केंद्र ही एक प्रेमाची इमारत असून येथील निराधारांचा मतदानासाठी असणारा उत्साह इतरांसाठी प्रेरणादायी आहे. लोकशाही हक्क बजावण्यासाठी सर्वांनी नक्की मतदान करावे,' असे आवाहन देखील त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम. ए. हुसैन यांनी करताना सावली निवारा केंद्रामार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

निराधारांनी घेतली मतदानाची शपथ 'आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज,भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू' अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली आणि लोकशाही बळकट करण्यासाठी १०० टक्के मतदान करण्याचा निर्धारही केला. प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

पाच वर्षापूर्वी मी निवारा केंद्रात आले आहे. मला कोणी नातेवाईक नाहीत, पण मला या केंद्रात खूप आपली माणसे भेटली आहेत. मला माझ्या हक्काची जाणीव देखील या केंद्रात झाली असून आगामी निवडणुकीत मी नक्की मतदान करणार आहे.

आनंदी साबळे, लाभार्थी

मी आजारी असताना मला दोन वर्षापूर्वी सावली निवारा केंद्रात आणण्यात आले. माझी येथे खूप व्यवस्थित काळजी घेतली जाते. आज आम्हाला मतदानाचे महत्त्व खूप छान पद्धतीने समजावून सांगण्यात आले. येत्या १५ जानेवारीला मी माझा मतदानाचा हक्क बजावणार आहे. सुशिला तडेल, लाभार्थी

चार वर्षांपासून मी सावली निवारा केंद्रामध्ये आहे. या केंद्रात अगदी कुटुंबातील सदस्याप्रमाणे काळजी घेतली जात आहे. येथे आम्हाला आमचे हक्क, जबाबदारी याबाबत देखील माहिती दिली जाते. मतदानाचे महत्त्व आज आम्हाला समजले असून आम्ही आगामी महापालिका निवडणुकीत मतदान करण्याची शपथ देखील घेतली आहे. शाम कोहोळ, लाभार्थी

## पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या मार्गावर !

### शरद पवार राष्ट्रवादीच्या गटाचे प्रशांत जगताप यांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत अजित पवार आणि शरद पवार यांच्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येण्याचे जवळपास निश्चित केले आहे. तर शरद पवार गटाने ठाकरे गटालाही सोबत घेण्याचा प्रस्ताव अजित पवारांसमोर मांडला आहे. मात्र, यामुळे शरद पवार गटात नाराजी उफाळून आली होती. शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या तर मी पक्षातून राजीनामा देईन, असा इशारा दिला होता. मात्र, प्रशांत जगताप यांच्या या इशाऱ्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला फारसा फरक पडलेला दिसत नाही.



प्रशांत जगताप यांच्या इशाऱ्यानंतरही पुण्यात दोन्ही राष्ट्रवादीतील नेत्यांची एक गुप्त बैठक झाली आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून अंकुश काकडे, विशाल तांबे तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुभाष जगताप आणि सुनील टिंगरे उपस्थित आहेत. दोन्ही पक्षातील स्थानिक नेत्यांच्या बैठकीनंतर वरिष्ठ नेत्यांना माहिती पाठवली जाणार आहे. आजच्या बैठकीत पुणे महानगरपालिका निवडणूक आणि इतर मुद्द्यांवर चर्चा झाली असण्याची शक्यता आहे. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास मी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा द्यायचे ठरवले आहे. मात्र, मी अद्याप पक्षाचा राजीनामा दिलेला नाही. मी सुप्रिया सुळेंना मुंबईत भेटणार आहे आणि त्यानंतर मी माझा निर्णय जाहीर करेन. अजित पवारांसोबत माझा वैयक्तिक वाद नाही. मात्र, अजित पवार एकीकडे महायुती सरकारमधे सहभागी असताना दुसरीकडे त्यांच्यासोबत आघाडी कशी करायची ? पुणेकरांना सक्षम विरोधीपक्ष हवा आहे. काँग्रेस अजित पवारांसोबत युती करायला तयार आहे, याबद्दल मला माहिती नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांनी याबद्दल निर्णय घ्यावा. कारण आपण कोणत्या तोंडाने लोकांना मते मागायची. महायुती सरकारने पुण्याचे वाटोळे केलेले आहे आणि अजित पवार त्या सरकारचा भाग आहेत. मी हेकेखोर नाही तर विचारधारा मानणारा आणि लढणारा कार्यकर्ता आहे, असे प्रशांत जगताप यांनी म्हटले.

**पुण्यात पक्षांतराला सुरुवात...**

**पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवार गटाला धक्का. पैलवान आणि माजी नगरसेवक अंबरनाथ कांबळे आणि त्यांची मुलगी दीप्ती कांबळे यांचा अजित पवार पक्षात प्रवेश. अंबरनाथ कांबळे हे आधी भाजपमध्ये होते त्यानंतर त्यांनी शरद पवार यांच्या गटात प्रवेश केला होता. आता त्यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे ठाकरे गटाचे माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार आणि माजी नगरसेवक संजय भोसले हेदेखील आज भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.**

## आंदेकर कुटुंबातील व्यक्तीला तिकीट देऊ नका !

### आयुष कोमकरच्या आई संजीवनी कोमकर यांची राजकीय पक्षांना विनंती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत (झींपश चींपळलळरिश्रि ऊेंरिींळेप एश्रशलींळेप २०२५) आंदेकर कुटुंबातील व्यक्तीला तिकीट देऊ नका, अशी विनंती आयुष कोमकरच्या (-ूीह घोज्ञरी) आई संजीवनी कोमकर यांनी राजकीय पक्षाकडे केली आहे. पुण्यातील माजी नगरसेवक वनराज आंदेकर (तरपीरक्ष -पवशज्ञरी) यांचा नातेवाईक असलेल्या गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याची गोळीबार करून हत्या करण्यात आली होती. या हत्येमुळे पुण्यासह राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. यात गोळीबाराच्या घटनेनंतर आंदेकर टोळीतील वाद अधिक चिघळला. या प्रकरणात बंडू उर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर (७०, रा. नाना पेठ) याच्यासह १३ जणांविरोधात खून आणि मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान आता आयुष कोमकरच्या आई कल्याणी कोमकर यांनी राजकीय पक्षाकडे विनंती करत निर्वाणीचा इशारा दिला आहे. पुण्यातील कुख्यात गुंड बंडू आंदेकर यांच्या कुटुंबातील दोन महिलांना आगामी पुणे महापालिका निवडणूक लढवण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. बंडू आंदेकर यांच्यासह माजी नगरसेविका लक्ष्मी आंदेकर आणि माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची पत्नी सोनाली आंदेकर या तिघांना निवडणूक रिंगणात उतरण्यास न्यायालयाने हिरवा कंदिल दाखवला आहे. दुसरीकडे आगामी महापालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून आंदेकर कुटुंबातील दोन सदस्य निवडणूक रिंगणामध्ये उतरण्याची चर्चा आहे. परिणामी याच विषयावर बोलताना आयुष कोमकरच्या आईने राष्ट्रवादीसह राजकीय पक्षांना विनंती केली आहे कि, सर्व राजकीय नेत्यांना माझी कळकळीची विनंती आहे जर आम्हाला न्याय देता येत नसेल तर आमच्यावरती अन्याय तरी करू नका. अंधेकरांना निवडणुकीचे तिकीट देऊ नका. माझ्या लहान मुलाचं त्यांनी आयुष्य उद्ध्वस्त केलं आहे. तरीही असं झाल्यास मी आत्मदहन करून आयुष्य संपवेल, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतलाय. त्यामुळे आता या प्रकरणी राजकीय पक्षाकडून या विनंतीची कितपत दखल घेतली जाते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.




माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचा नातेवाईक असलेल्या गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याची गोळीबार करून हत्या करण्यात आली होती. या हत्येमुळे आंदेकर टोळीतील वाद अधिक चिघळला. या प्रकरणात बंडू उर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर (७०, रा. नाना पेठ) याच्यासह १३ जणांविरोधात खून आणि मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या खटल्यातील आरोपी आणि बंडू आंदेकर याचा मुलगा कृष्णा उर्फ कृष्णराज आंदेकर (३६) हा आयुषच्या खुनानंतर फरार झाला होता. काही दिवसांपूर्वी बंडू आंदेकर याने सार्वजनिकरित्या कृष्णाचा शोध द्या, नाहीतर त्याचा एन्काउंटर होईल, असा दावा केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी कृष्णा आंदेकर स्वतःहून समर्थ पोलिस ठाण्यात हजर झाला.

## टाकळी हाजीमध्ये ४ वर्षांची बिबट मादी जेरबंद; २७ बिबटे पकडण्यात वन विभागाला यश

**शिरूर । प्रतिनिधी**

टाकळी हाजी (ता. शिरूर) परिसरात गेल्या काही दिवसांपासून पसरलेल्या दहशतीला काही अंशी विराम मिळाला असून, वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी रात्री एक चार वर्षांची बिबट मादी जेरबंद झाली आहे. या भागातील टेमकरवाडी, तामखरवाडी आणि गावठाण परिसरात बिबट्यांच्या वावरामुळे शेतकरी व मजुरांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण होते.



टाकळी हाजी येथील नामदेव लोखंडे यांच्या शेतात वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून पिंजरा लावला होता. रविवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास शिकारीच्या शोधात आलेली ही बिबट मादी पिंजऱ्यात अडकली. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

ही मादी चार वर्षांची असून तिला वैद्यकीय तपासणीसाठी जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले असल्याची माहिती वनरक्षक लहू केसकर यांनी दिली.पिंपरखेड बीट अंतर्गत आतापर्यंत एकूण २७ बिबटे जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले आहे. सध्या शिरूरच्या बेट भागात ऊसतोडणीचा हंगाम सुरू असल्याने ऊसाची शेते मोकळी होत आहेत, परिणामी बिबट्यांचा मानवी वस्तीत येण्याचे प्रमाण वाढले आहे. स्थानिक नागरिकांनी या परिसरात बिबटे समूहाने फिरत असल्याचे आणि आवाज देत असल्याचे वेळोवेळी सांगितले आहे. परिसरात अजूनही इतर बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी विशेष सतर्क राहावे, असे आवाहन शिरूरचे वन परिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी केले आहे.

## एसटी बसमध्ये शिक्रापुरात १ तोळ्यावर मारला डल्ला

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिक्रापूर - पुणे-नगर महामार्गावरून एसटीने प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या बॅगेतील एक तोळा वजनाचे सोन्याचे नाणे अज्ञात महिलांनी हातोहात लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलिसात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रेखा युवराज साळवे (वय ४५, रा. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) या छत्रपती संभाजीनगर येथून एसटीने प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान त्यांनी त्यांचे मौल्यवान साहित्य आणि एक तोळा वजनाचे सोन्याचे नाणे आपल्याजवळील बॅगेत ठेवले होते. बस रांजणगाव येथे आली असता तेथून पाच महिला बसमध्ये चढल्या. त्यातील एक महिला रेखा साळवे यांच्या शेजारी येऊन बसली होती. बस शिक्रापूर परिसरात आली असता, संबंधित महिला बसमधून खाली उतरून निघून गेल्या.काही वेळाने रेखा साळवे यांना आपल्या बॅगेची चैन उघडी असल्याचे दिसून आले. त्यांनी तातडीने बॅगेची पाहणी केली असता, त्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे नाणे चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर साळवे यांनी शिक्रापूर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## मुलाची 'धिंड' काढल्याच्या रागातून आई-वडिलांचा लोणी काळभोर पोलीस ठाण्यासमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न !

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

रस्ता अडवून रस्त्यावरच वाढदिवस साजरा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या तरुणाला अटक केल्यानंतर त्याची धिंड काढल्याचा आरोप करत, संबंधित तरुणाच्या आई-वडिलांनी अंगावर ज्वालाग्राही पदार्थ ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना लोणी काळभोर पोलीस ठाण्यासमोर घडली. राज रविंद्र पवार याचा गुरुवारी (दि. १८) वाढदिवस होता. हा वाढदिवस साजरा करण्यासाठी त्याचे मित्र कदमवाकवस्ती (ता. हवेली) परिसरात जमले होते. यावेळी बेकायदेशीर जमाव जमवून वाहतुकीस अडथळा निर्माण करत रस्ता अडविण्यात आला होता. घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात १६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तत्काळ १३ जणांना अटक केली, तर राज पवारसह तिघे जण फरार झाले होते. फरार असलेल्या राज पवारला रविवारी पोलिसांनी अटक केली. अटक केल्यानंतर राज पवारला घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पोलिस घटनास्थळी घेऊन गेले होते. यावेळी पोलिसांनी धिंड काढल्याचा आरोप त्याच्या पालकांनी केला आहे. या घटनेचा राग मनात धरून राज पवारच्या आई-वडिलांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यातच अंगावर रॉकेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.आमच्या मुलावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कोणतेही चुकीचे कृत्य न करता देखील पोलिसांनी आमच्यावर अन्याय केला आहे. आमच्या मुलाची विनाकारण धिंड काढण्यात आली. त्याला तात्काळ सोडून द्यावे, आम्हाला न्याय द्यावा, अन्यथा आम्ही दोघेही जीवन संपवू, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. या घटनेनंतर पोलीस ठाण्याच्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणावर पोलीस ठाण्यात चर्चा सुरू होती. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.



## चांडोहमध्ये ६ वर्षांची बिबट मादी जेरबंद; वनविभागाची मोठी कारवाई

**शिरूर । प्रतिनिधी**

चांडोह (ता. शिरूर) येथे शेतकरी हर्षल भुजबळ यांच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (दि. २२) पहाटे सहा वर्षे वयाची बिबट मादी जेरबंद झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात बिबट्यांचा मुक्त संचार वाढल्याने नागरिक भयभीत झाले होते, या पार्श्वभूमीवर वनविभागाला मिळालेले हे यश महत्त्वाचे मानले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरखेड, जांबूत, चांडोह आणि फाकटे या परिसरात बिबट्यांची मोठी दहशत आहे. वनविभागाने गेल्या दोन महिन्यात या भागातून सुमारे २५ बिबटे जेरबंद केले आहेत, मात्र तरीही दिवसाढवळ्या बिबट्यांचे दर्शन होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या बिबट मादीला पुढील उपचार आणि निरीक्षणासाठी जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले असल्याची माहिती वनरक्षक लहू केसकर यांनी दिली.वनविभागाने शासनाच्या आदेशानुसार या भागात पिंजरे लावण्याची मोहीम तीव्र केली आहे. चांडोहमध्ये बिबट्या पकडला गेल्याने परिसरातील नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी भविष्यातील धोका लक्षात घेता वनविभागाने अधिकाधिक पिंजरे लावून हा परिसर बिबटमुक्त करावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.


## अन्न व औषधे विभागाचा तोतया निरीक्षक खेड पोलिसांच्या ताब्यात

**खेड । प्रतिनिधी**

अन्न आणि औषधे विभागाचा निरीक्षक असल्याचे भासवुन मेडिकल दुकानाची (औषध विक्री) तपासणी करणारा तसेच त्यातील नसलेले दोष दाखवुन २० हजार रुपयांची मागणी करणाऱ्या तोतया निरीक्षकाला खेड पोलिसांनी ताब्यात घेतले. मेडिकल संघटनेच्या सदस्य, दुकानदारांनी मंगळवारी (दि. २३) उघडकीस आणलेल्या या प्रकाराने राजगुरुनगर शहरात खळबळ उडाली.

आकाश कोंडुसकर (मुळ नाव आनंद भुजंग, वय ३४, रा. सांगवी, पुणे) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तोतया निरीक्षकाचे नाव आहे. राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आवरा बाहेर असलेल्या भवानी मेडिकलमध्ये एक व्यक्ती आली. त्याने आपण अन्न आणि औषध विभागाचा वरिष्ठ निरीक्षक असल्याचे सांगितले. त्याने विविध चौकश्या सुरू केल्या आणि २० हजार रुपयांची मागणी केली. असे करताच मेडिकल चालक तरुण चौधरी यांनी त्याचे आय कार्ड पाहण्यासाठी मागितले. हे कार्ड पाहण्यासाठी घेतल्यावर नेहमी येणाऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा नवीन वाटणारे नाव वाचुन घेतले.

बाजुला जाऊन संघटनेतील राजु चौधरी, निलेश आरबुज व इतर सदस्यांना त्यांनी संपर्क साधला. पदाधिकाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासनाला तातडीने संपर्क साधला. अशा नावाचा कोणीही अधिकारी आपल्या विभागात नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर या निरीक्षकाला थांबवुन ठेवण्याचे सांगण्यात आले; मात्र संशय आल्याने हा तोतया पोलिस निरीक्षक नाष्टा करून परत येतो म्हणुन येथुन निसटला. राजू चौधरी, निलेश आरबुज व इतरांनी तो गेलेल्या मार्गावर त्याचा मागोवा घेतला. एका सीएनजी पंपावर हा व्यक्ती त्याच्या वॅगन आर वाहनात गॅस भरून घेत असल्याचे दिसून आले. सगळ्यांनी त्याला घेरले. प्रश्नांची सरबत्ती केल्यावर त्याची गाळण उडाली. तो जाण्याचा प्रयत्न करू लागला; मात्र मेडिकल संघटनेच्या सदस्यांनी त्याला पोलिस ठाणे दाखवले. तोतयागिरी आणि त्याद्वारे फसवणुक करण्यावरून आकाश कोंडुसकर (मुळ नाव आनंद भुजंग, वय ३४, रा. सांगवी, पुणे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरु असल्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वी याच व्यक्तीने आळंदी परिसरात अशाच प्रकारे अनेक मेडिकल दुकानदारांना अधिकारी असल्याचे सांगुन लाखो रुपये लुबाडल्याचे मेडिकल संघटनेचे अध्यक्ष धनंजय गारगोटे यांनी सांगितले. राजू चौधरी, निलेश आरबुज , नितीन पवळे, श्रीकांत आरुडे, मोहसीन आत्तार, केतन घोरपडे आदी मेडिकल संघटनेच्या सदस्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.



## पिंपरखेड-भागडी रस्त्यावर भीषण अपघात; २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू

*शिरूर । प्रतिनिधी*

पिंपरखेड (ता. शिरूर) येथील भागडी रस्त्यावर एका अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेत त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून, ही घटना रविवारी (दि. २१) संध्याकाळी सव्वा सातच्या सुमारास घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निखिल संदीप इचके (वय २३) आणि त्याचा मित्र आकाश वसंत इचके (दोघे रा. कवठे येमाई, ता. शिरूर) हे आपल्या दुचाकीवरून भागडी-पिंपरखेड रस्त्याने जात होते. रात्री पावणे नऊच्या सुमारास दाभाडेवस्ती परिसरात एका भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, निखिल इचके याच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात आकाश इचके हा देखील गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.याप्रकरणी निखिलचे मामा बबन लक्ष्मण कोरके (रा. सविंदणे, ता. शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, शिरूर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.